16 Nov 2026_Layout 1 11/15/2026 10:00 PM Page 1

नोव्हेंबर/November
सोमवार/Monday
दि.१६/Dt: 16
२०२६/2026

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ६ पाने Pages 6

किंमत ३ रूपये Price 3 rupees

Jagmitra2010@gmail.com

● मा.संपादक : कृष्णा कडबाने 7030908787 ● निवासी संपादक : मकरंद जहागीरदार 9422216061, 9371591760 ● कार्यकारी संपादक : शेख बिलाल 9422404740

www.jagmitra.com

● बीड/Beed ● वर्ष १७ वे/Year 17 ● अंक २५/Issue 25 ● आरएनआय नं.एमएचएमएआर/२०११/३८८१४ /RNI.No.MAHMAR/2011/38814

देवपिंप्री वीज वाहिनी स्थलांतरण; दोन वर्षे फाईल दाबणाऱ्या बकासुरांची चौकशी करा!

उच्चदाबाचे १८ खांब व लाखो रुपयांचे साहित्य गायब; तत्कालीन अधिकाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार!

दोन पंचनामे, पण मूळ साहित्य गायब; लाखोंचा माल परस्पर विकल्याचा संशय!

परमिट देणारा ऑपरेटर आणि घेणारा अभियंता रडारवर; पोलीस तपासात फुटणार बिंग!



गुन्ह्याचे पत्र तयार असूनही पोलिसांत का दिले नाही? तत्कालीन अभियंत्याची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात!

परमिट कोणी घेतले आणि कोणी दिले; महावितरणच्या आतील भेदी कोण?

या बेकायदेशीर कामातील सर्वात मोठा आणि धक्कादायक प्रश्न म्हणजे, चालू उच्चदाब वीज वाहिनीचे काम करण्यासाठी परमिट (शटडाऊन) नेमके कोणी घेतले होते आणि ते परमिट देणारा सब-स्टेशनमधील ऑपरेटर कोण होता? महावितरणच्या अधिकृत परवानगीशिवाय परमिट मिळूच शकत नाही. त्यामुळे या गुन्ह्यात बाहेरील ठेकेदारासोबतच महावितरणच्या आतील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा थेट सहभाग असल्याचे स्पष्ट होत आहे. परमिट घेणारा सहायक अभियंता आणि देणारा ऑपरेटर यांची कसून चौकशी केल्यास या रॅकेटचे धागेदोरे उघड होणार आहेत.

पोलीस तपास आणि थेट मंत्रालयात तक्रारीचा इशारा

अखेर विद्यमान उपकार्यकारी अभियंता शाम कुंभार यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत २ नोव्हेंबर २०२६ रोजी नव्याने पंचनामा केला आणि ३ नोव्हेंबर रोजी गेवराई पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दिली. त्यानुसार १३ नोव्हेंबर २०२६ रोजी सेल रे पॉवर लिमिटेड कंपनी आणि अमोल राठोड यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आता गेवराई पोलीस निरीक्षकांनी केवळ गुन्हा दाखल करून न थांबता तत्कालीन उपकार्यकारी अभियंता शाम मोरे, संबंधित सहायक अभियंता, लाईनमन, परमिट घेणारा व देणारा ऑपरेटर तसेच सेल रे पॉवर लिमिटेड व अमोल राठोड यांची कसून चौकशी करावी; तरच गायब झालेले उच्चदाब साहित्य कोणी लंपास केले आणि १० लाखांची सेटिंग कशी झाली, हे सर्व रहस्य उघड होईल. दरम्यान, या संपूर्ण भ्रष्टाचार व शासकीय मालमत्ता अपहार प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई व्हावी, यासाठी आता थेट मंत्रालयात तक्रार दाखल केली जाणार आहे. तसेच बीड येथील महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ दखल घेत सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागवावा, अशी आक्रमक मागणी जनतेतून होत आहे.

गेवराई/जगमित्र न्यूज

मौजे देवपिंप्री येथील बेकायदेशीर उच्चदाब (एच.टी.) वीज वाहिनी स्थलांतरण प्रकरणात आता आणखी एक खळबळजनक आणि गंभीर पैलू समोर आला आहे. अनधिकृतपणे स्थलांतरित केलेल्या उच्चदाब वाहिनीचे मूळ १८ वीज खांब, महागड्या विद्युत तारा आणि इतर लाखो रुपये किमतीचे शासकीय साहित्य नेमके गेले कुठे, असा संतप्त सवाल नागरिक विचारू लागले आहेत. धक्कादायक म्हणजे, १२ जुलै २०२४ रोजी तत्कालीन अधिकाऱ्यांनी केलेला पंचनामा असो वा २ नोव्हेंबर २०२६ रोजी विद्यमान अधिकाऱ्यांनी केलेला पंचनामाया दोन्ही पंचनाम्यांमध्ये काढलेल्या मूळ उच्चदाब साहित्याचा कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही! त्यामुळे हे लाखो रुपयांचे शासकीय साहित्य मेसर्स सेल रे पॉवर लिमिटेड कंपनी, खासगी ठेकेदार अमोल राठोड की तत्कालीन उपकार्यकारी अभियंता शाम मोरे आणि सहायक अभियंता यांच्यापैकी कोणी लंपास केले, याचा पर्दाफाश होणे अत्यंत गरजेचे बनले आहे. मौजे देवपिंप्री येथे महावितरणच्या नियमांना केराची टोपली दाखवून १८ वीज खांब, १ रोहित्र (डीपी) आणि दुसऱ्या रोहित्राचे ७ खांब बेकायदेशीरपणे स्थलांतरित केल्याचा महाघोटाळा उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे, हा गंभीर प्रकार तब्बल दोन वर्षांपूर्वीच समोर येऊनही आणि पंचनामा होऊनही तत्कालीन अधिकाऱ्यांनी गुन्हा दाखल करण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ केल्याने महावितरणच्या कारभाराचे वाभाडे निघाले आहेत. देवपिंप्री येथे मेसर्स सेल रे पॉवर लिमिटेड कंपनीने स्थानिक खासगी ठेकेदार अमोल राठोड (रा. देवपिंप्री) याच्याशी आर्थिक संगनमत करून वीज यंत्रणेचे अनधिकृत स्थलांतर केले. या कामात प्रशासकीय किंवा तांत्रिक परवानगी न घेता महावितरणच्या सुरक्षा नियमांचे सर्रास उल्लंघन करण्यात आले आहे. इतकेच नव्हे, तर अनधिकृतपणे जमा केलेले जुने आणि अत्यंत निकृष्ट दर्जाचे लघुदाब खांब या कामासाठी वापरण्यात आले आहेत.या गंभीर प्रकाराची दखल घेत तत्कालीन उपकार्यकारी अभियंता शाम मोरे यांनी १२ जुलै २०२४ रोजी घटनास्थळाचा पंचनामा केला होता. या पंचनाम्यात सेल रे पॉवर लिमिटेड आणि अमोल राठोड दोषी असल्याचे स्पष्ट झाले होते. कारवाईसाठी गेवराई पोलीस ठाण्यात देण्याचे पत्रही तयार करण्यात आले; मात्र, ते पत्र पोलिसांना दिलेच गेले नाही! दोषी समोर असूनही तत्कालीन उपकार्यकारी अभियंता शाम मोरे यांनी गुन्हा दाखल का केला नाही? खासगी ठेकेदाराकडून तब्बल १० लाख रुपयांची माया घेऊन हे प्रकरण दाबण्यात आल्याची जोरदार चर्चा गेवराई उपविभागीय कार्यालयात सुरू आहे. महावितरणचे कोट्यवधींचे नुकसान करणारा हा बकासुर नेमका कोण, याचा शोध घेण्याची मागणी सुजाण नागरिकांतून होत आहे.

लघुदाबाचे जुने खांब लावले, मग मूळ उच्चदाब साहित्य कोणाच्या घशात?

मूळ उच्चदाब वाहिनीचे मजबूत खांब, महागड्या विद्युत तारा आणि इतर साहित्य काढून त्या जागी निकृष्ट लघुदाब खांब लावले गेले. तर मग मूळ उच्चदाब वाहिनीचा लाखो रुपयांचा माल कोठे गायब झाला? दोन्ही पंचनाम्यांत या साहित्याचा साधा उल्लेखही नसल्याने, हा माल परस्पर विकून खिसे भरले गेले का, असा संशय आता बळावला आहे.

बीड जिल्हा परिषद सीईओंना सत्तेची धुंदी; गुन्हा दाखल करायचा तर करा, मी परवानगी देणारच!

चौकशी समितीचा अहवाल धाब्यावर; पात्र कंत्राटदाराला अपात्र ठरवणाऱ्या सरपंचाची सीईओंकडून पाठराखण!

बीड/जगमित्र न्यूज

तुम्हाला काय करायचे ते करा, माझ्यावर गुन्हा दाखल करायचा असेल तर करा, मी बांधकाम परवानगी देणारच! नमस्कार, तुम्ही जाऊ शकता... ही भाषा कोणत्याही गुंडाची नसून, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांची आहे! बीड तालुक्यातील भवानवाडी ग्रामपंचायतीच्या ई-निविदा प्रक्रियेत सरपंचाने केलेला कोट्यवधींचा झोल पंचायत समितीच्या चौकशी समितीने पुराव्यानिशी उघडकीस आणला आहे. मात्र, या भ्रष्टाचारावर कारवाई करण्याऐवजी न्याय मागण्यासाठी गेलेल्या तक्रारदारांनाच सीईओ जितीन रहमान यांनी अरेरावीची भाषा वापरून हाकलून लावल्याने बीडच्या प्रशासकीय वर्तुळात तीव्र संताप व्यक्त होत आहे. बीड तालुक्यातील मौजे भवानवाडी ग्रामपंचायतीअंतर्गत गावातील स्मशानभूमी शेड बांधकाम आणि मुंडे वस्ती येथील अंगणवाडी इमारत बांधकाम या दोन कामांसाठी ई-निविदा काढण्यात आल्या होत्या. या प्रक्रियेविरोधात ग्रामपंचायत सदस्य अमोल शिवाजी शिंदे, हनुमंत मनोहर जगताप आणि कंत्राटदार विठ्ठल भगवानराव तावरे यांनी तक्रार दाखल केली होती. त्यानुसार बीड पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी १९ मे २०२६ रोजी चार सदस्यीय चौकशी समिती नेमली होती. या चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालात सरपंचाच्या मनमानी कारभाराचा बुरखा फाडला आहे. जुन्या निविदेला केवळ एकच प्रतिसाद मिळाल्याने ती रद्द करणे बंधनकारक होते. मात्र, ती रद्द न करताच ०४ एप्रिल २०२६ ते ०९ एप्रिल २०२६ दरम्यान पुन्हा नव्याने ई-निविदा मागवण्यात आल्या. नव्या निविदेत ६ कंत्राटदारांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी ४ जणांना पात्र ठरवून सत्यजीत भाऊसाहेब डावकर (मुदतबाह्य प्रमाणपत्र) आणि विठ्ठल भगवानराव तावरे यांना अपात्र ठरवले गेले. धक्कादायक बाब म्हणजे, तावरे यांनी सर्व कागदपत्रे वेळेत व नियमानुसार अपलोड केली होती, हे पंचायत समितीच्या पडताळणीत स्पष्ट झाले आहे. तरीही सरपंचाने कागदपत्रे दाखल केली नाहीत असे खोटे कारण दाखवून त्यांना जाणीवपूर्वक अपात्र ठरवले. ही संपूर्ण निविदा प्रक्रिया सरपंच आणि ग्रामसेवक यांच्या संयुक्त डिजिटल कीने होणे अपेक्षित असताना, सरपंचाने परस्पर स्वतःच्या डिजिटल कीचा वापर करून हा सर्व घोळ घातल्याचे चौकशी अहवालात सिद्ध झाले आहे.

भवानवाडीतील ग्रामस्थ आणि सुजाण नागरिकांकडून प्रशासनाला सवाल..

जर जिल्ह्याचे सर्वोच्च प्रशासकीय अधिकारीच चौकशी अहवालाला केराची टोपली दाखवून भ्रष्ट कारभाराला अभय देणार असतील आणि सामान्य नागरिकांना गुन्हा दाखल करण्याची धमकी देणार असतील, तर जिल्ह्यात लोकशाही आणि कायद्याचे राज्य शिल्लक आहे की नाही? असा संतप्त सवाल आता भवानवाडीतील ग्रामस्थ आणि सुजाण नागरिक विचारत आहेत. या मुजोर अधिकाऱ्याची आणि भ्रष्ट सरपंचाची वरिष्ठ पातळीवरून तात्काळ चौकशी होऊन कारवाई होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



सीईओंची अरेरावी; लोकशाही उरली आहे की नाही?

पंचायत समितीच्या चौकशी समितीने या दोन्ही ई-निविदांमध्ये स्पष्टपणे अनियमितता झाल्याचा ठपका ठेवला आहे. हाच अहवाल घेऊन तक्रारदार जेव्हा बीड जिल्हा परिषदेचे सीईओ जितीन रहमान यांच्याकडे न्यायाची अपेक्षा घेऊन गेले, तेव्हा सीईओंनी तक्रारदारांचे म्हणणे ऐकून घेण्याऐवजी सत्तेची मस्ती दाखवली. "मी बांधकाम परवानगी देणार आहे, तुम्हाला काय करायचे ते करा, माझ्यावर गुन्हा दाखल करायचा असेल तर करा, अशी उद्धट आणि बेजबाबदार भाषा त्यांनी वापरल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे.

वाघाच्या हल्ल्यातील मृत शेतकऱ्याच्या कुटुंबीयांचे खा.बजरंग सोनवणेंकडून सांत्वन



आष्टी/प्रतिनिधी


तालुक्यातील देवळाली येथील शेतकरी देविदास टकले यांचा दिवाळीच्या पूर्वसंध्येला वाघाच्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाला होता. या घटनेच्या पार्श्वभूमीवर खा.बजरंग सोनवणे यांनी रविवारी देवळाली येथे टकले कुटुंबीयांची घरी जाऊन सांत्वनपर भेट घेतली आणि त्यांना धीर दिला. सणासुदीच्या तोंडावर घडलेल्या या हृदयद्रावक घटनेमुळे देवळालीसह संपूर्ण परिसरात तीव्र हळहळ व्यक्त होत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. खासदार सोनवणे यांनी टकले कुटुंबीयांची विचारपूस करत या कठीण प्रसंगी सर्वतोपरी पाठीशी उभे राहण्याचा विश्वास दिला. देवळाली आणि आसपासच्या शिवारात गेल्या काही दिवसांपासून वाघ, बिबट्या यांसारख्या हिंस्र वन्यप्राण्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. यामुळे शेतात काम करणारे शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामस्थांच्या जीविताचा प्रश्न गंभीर बनला असून रात्री-अपरात्री शेतीची कामे करणे कठीण झाले आहे. वनविभागाने या घटनेची तातडीने गंभीर दखल घ्यावी, परिसरात दिवसा व रात्रीची गस्त वाढवावी, तसेच पिंजरे लावून या हिंस्र वन्यप्राण्यांचा त्वरित बंदोबस्त करावा आणि नागरिकांच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी ठोस उपाययोजना राबवाव्यात, अशा स्पष्ट सूचना खा. सोनवणे यांनी यावेळी संबंधित वनअधिकाऱ्यांना दिल्या.

परळी आगारात अस्वच्छतेचे साम्राज्य; स्वच्छतेचे टेंडर असलेल्या क्रिस्टल कंपनीचा कारभार चव्हाट्यावर!

परळीचे आगार प्रमुख सोनवणे व कंपनीची मिलीभगत; प्रवाशी व नागरिकांना मोठा त्रास!

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

परळी आगारात मागील अनेक महिन्यापासून आगरप्रमुख सोनवणे यांच्या मार्फत मोठ्या प्रमाणात अनागोंदी व मनमानी कारभार सुरु असून त्यात परळी आगारातील संपूर्ण स्वच्छतेचे काम ज्या क्रिस्टल कंपनीकडे आहे,त्या कंपनीकडून स्वच्छतेकडे अजिबात लक्ष दिले जात नसून कंपनी व आगारप्रमुख यांची मिलीभगत असून त्यातून स्वच्छतेसाठीचे काम न करताच कंपनीने लाखो रुपये हडप केले आहेत, (पान २ वर)





मोठी कारवाई-कत्तलीसाठी जाणारे ८ नंदी-बैल पकडले

सिरसाळा/प्रतिनिधी

आज सिरसाळा (ता. परळी वैजनाथ) येथे कत्तलीसाठी घेऊन जात असलेली ८ गोवंश जनावरे (नंदी-बैल) पकडण्यात आली. दोन अशोक लेलँड गाड्यांमधून (एका गाडीत ५, दुसऱ्या गाडीत ३) ही जनावरे निर्दयतेने कोंबून नेत असल्याची माहिती मिळताच हिंदुराष्ट्र सेना तालुका अध्यक्ष विजय बडे व गोरक्षक टीमने गाड्या अडवून पोलिसांना माहिती दिली.

माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबा भिलू राठोड यांच्या नेतृत्वाखाली राठोड साहेब व त्यांच्या टीमने घटनास्थळी धाव घेत दोन्ही वाहने व ८ जनावरे ताब्यात घेतली. पकडलेली सर्व जनावरे सुरक्षित गोशाळेत पाठवण्यात आली असून, महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा कलम ५, ५ नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या धडक कारवाईबद्दल अधिकारी व गोरक्षक यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



बीड, परभणी, लातूर, धाराशिव, जालना, नांदेड, मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर... या जिल्ह्यात स्वंतत्ररित्या प्रकाशित होणारे एकमेव दैनिक

16 Nov 2026 page 2_Layout 1 11/15/2026 11:48 PM Page 1

महाराष्ट्रातील निर्भीड दैनिक
जगमित्र
विशेष संपादकीय

मोजक्यांची मक्तेदारी!

सर्वप्रथम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन. त्याची प्रमुख कारणे दोन. मुंबई विमानतळावरील विमाने नवी मुंबई विमानतळावर नेली जावीत किंवा काय यावरील वादात त्यांनी उडी घेतली. हे पहिले कारण. आणि नवी मुंबई विमानतळावरील वर्दळ वाढावी यासाठी विद्यमान मुंबई विमानतळावरील काही सेवा तिकडे वळवण्यास त्यांनी स्पष्ट विरोध दर्शवला. हे त्यांच्या अभिनंदनाचे दुसरे कारण. हे दोन्ही विमानतळ अदानी समूहाकडे आहेत. म्हणजे मुख्यमंत्र्यांनी एका अर्थी अदानी समूहाच्या निर्णयास विरोध दर्शवला. ही बाब स्पष्ट केल्यास अभिनंदनामागील कारण लक्षात यावे. नवी मुंबईतील नव्या विमानतळाची वाहतूक वाढावी यासाठी विद्यमान विमानतळावरील सेवा कमी करण्याचा आग्रह धरणे म्हणजे दोन भावांत ज्याचे बरे चालले आहे त्यास व्यवसायात चेपून ज्याचे बेतासबात चालले आहे त्याच्याकडे वळवणे. खरे तर असे करणे हे घरगुती पातळीवरही क्षम्य नाही. त्यामुळे ते शुद्ध व्यावसायिक मुद्द्यावरही अक्षम्यच ठरते. तशी भूमिका मुख्यमंत्र्यांनी घेतली ही यातील महत्त्वाची बाब. त्यांनी केंद्रीय हवाई वाहतूक खात्यास पत्र लिहून मुंबई विमानतळावरील उड्डाणे नवी मुंबईकडे वर्ग करण्यास विरोध दर्शवला. अदानी कंपनीस मुंबईतील जुना- म्हणजे सांताक्रूझ येथील- विमानतळ पाडून त्या जागी नवीन रचना निर्माण करावयाची आहे. त्यासाठी तो विमानतळ पूर्ण बंद करण्याचा आणि त्या ऐवजी तेथील सेवा नवी मुंबई विमानतळाकडे हलवण्याचा घाट कंपनीने घातला. त्यास आधी विमान कंपन्यांनी विरोध केला. नंतर केंद्र सरकारने मध्यस्थी करून हा निर्णय पुढे ढकलण्यास भाग पाडले. त्यानुसार तो पुढील वर्षापासून अंमलात आणण्याचा निर्णय अदानी समूहाने घेतला. त्यास आता महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीही आक्षेप घेत असतील तर ती बाब दखलपात्र ठरते. कारण प्रश्न एखाद-दुसऱ्या विमानतळ वा त्याच्या कंत्राटाचा नाही. तो देशात मोजक्यांची मक्तेदारी निर्माण व्हावी का, हा आहे. ही बाब सामान्य करदात्यांशी संबंधित असल्याने त्यावर साधक-बाधक चर्चा व्हायलाच हवी.

ती करताना अदानी समूहास हा विमानतळ कसा मिळाला, तो आधी कोणत्या कंपनीकडे होता, कोणत्या परिस्थितीत त्या कंपनीस आपली मालकी सोडावी लागली, कोणत्या सरकारी यंत्रणांनी त्यासाठी दबाव आणला इत्यादी मुद्द्यांची चर्चा आता करण्यात अजिबात अर्थ नाही. त्यावर पुरेसा काथ्याकूट झालेला आहे आणि त्यातून काही निष्पन्न होत नाही, हेही सिद्ध झालेले आहे. कितीही गंभीर असले तरी कोणत्याही आरोपांना उत्तर द्यायचेच नाही, असा विद्यमान सत्ताधीशांचा खाक्या असल्याने मुंबई विमानतळाच्या बदललेल्या मालकी आणि हस्तांतराबाबत केवळ चर्चा झडल्या. पुढे काही घडले नाही. इतकेच नव्हे तर त्यावेळी आणि त्यानंतर मुंबई विमानतळापाठोपाठ देशातील आठ महत्त्वाचे विमानतळ या कंपनीकडे सोपवण्यात आले. त्यात अहमदाबाद, लखनऊ, जयपूर, मंगळूरु इत्यादी वाढत्या शहरांतील विमानतळांचा समावेश आहे. तसे करण्याआधी या कंपनीस विमानतळ चालवण्याचा अनुभव होता किंवा कसे हा प्रश्नही निरर्थक ठरावा असे विद्यमान वास्तव. साधी टाचणी बनवण्याचाही अनुभव नसलेल्यांस विमाने बनवण्याचे कंत्राट विनासायास देता येत असेल तर रिक्षा स्टँडचेही व्यवस्थापन न केलेल्यांहाती अनेक विमानतळ सोपवणे यात काहीही गैर नाही. हा मुद्दा सरकार आणि संबंधित उद्योगसमूह यांच्या परस्पर संबंधांचा आहे. त्याबाबतही नव्याने बोलावे असे काही नाही. तेव्हा त्या कंपनीच्या पदरात तेलापासून विमानतळापर्यंत आणि डाळी-डालड्यापासून सौरवीज-कोळसाखाणींपर्यंत सर्व कंत्राटे पडत असतील तर त्यास प्राप्त परिस्थितीत इलाज नाही. तेव्हा मुद्दा तो नाही. तो मक्तेदारी वा मक्तेदारीसदृश परिस्थिती निर्माण होऊ देण्याबाबतचा आहे. विमान वाहतुकीच्या क्षेत्रात ही बाब प्रकर्षाने दिसून येते. त्यातूनच काही महिन्यांपूर्वी मइंडिगोफया एका विमान कंपनीने संपूर्ण देशास कसे वेठीस धरले ते दिसून आले. भारतीय विमानवाहतूक क्षेत्रातील जवळपास ६६ टक्के इतका वाटा केवळ मइंडिगोफ या कंपनीचा आहे. म्हणजे हवाई प्रवास करणाऱ्या १०० प्रवाशांपैकी ६६ जण मइंडिगोफ्या वापर करतात. ही बाब त्या कंपनीसाठी कौतुकाची असेलही. पण सरकारने केलेल्या एका नियमाची अंमलबजावणी करण्यास ही कंपनी असमर्थ ठरली आणि सारा देश जमिनीवर आला. त्यातून निर्माण झालेली परिस्थिती महासत्तापदाचे स्वप्न पाहणाऱ्या देशासाठी निश्चित नामुष्कीची होती. आजमितीस मइंडिगोफ आणि मएअर इंडियाफया दोन कंपन्यांत देशातील हवाई वाहतुकीचा ९० टक्के वा अधिकच वाटा विभागला गेलेला आहे. त्यामुळे यातील एका कंपनीचे जरी काही बरे-वाईट झाले तर देश स्तब्ध होतो, अशी परिस्थिती. तीच बाब दूरसंचार क्षेत्राबाबत. सरकारने आपल्या कर्तृत्वाने ममहानगर टेलिफोन निगमफ (एमटीएनएल) आणि मभारत संचार निगमफ (बीएसएनएल) या स्वमालकीच्या कंपन्यांस जवळपास संपवले. आज त्यांचे अस्तित्व म्हणजे शेवटची धुगधुग. या दोन सरकारी कंपन्यांच्या मोक्षाची तजवीज केल्यानंतर सुनील भारती-मित्तल चलित मएअरटेलफ आणि मुकेश अंबानींच्या मरिलायन्सफ्च्ये मजिओफ यांच्या हाती भारतीय मोबाईल टेलिफोनी एकवटल्यासारखे चित्र आहे. नाही म्हणायला कुमारमंगलम बिर्ला यांच्या मआयडियाफ्च्या सहकार्याने मव्होडाफोनफ मान वर करायचा प्रयत्न करताना दिसतो. पण मएअरटेलफ, मजिओफ यांच्या तुलनेत मव्हीआयफ लक्षणीयरित्या मागे आहे. तेच चित्र सिमेंट क्षेत्रातही दिसते. या क्षेत्रात आदित्य बिर्ला समूहाचे मअल्ट्राटेकफ आघाडी राखून आहे हे खरे. पण गेल्या दशकभरात अदानी समूहाने मोठ्या गतीने अंबुजा, एसीसी आदी कंपन्यास आपल्या झोळीत टाकले आणि सिमेंट उत्पादनात दुसऱ्या क्रमांकावर झेप घेतली. आता जे सुरू आहे ते तसेच कायम राहिले तर उद्या काय होईल हे सांगण्यास व्यवसायतज्ज्ञ असण्याची गरज नाही. वीज वितरण, कोळसा खाणी, त्याचवेळी सौर ऊर्जा, बंदरे, नैसर्गिक वायू, खाद्यतेल, डाळी अशा अनेक क्षेत्रात या समूहाचा विस्तार अचंबित करणारा आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईतील विमानतळ आणि विमान कंपन्यांच्या स्थलांतराचा मुद्दा विचारात घ्यायला हवा. यात महत्त्वाची बाब अशी की संबंधित विमान कंपन्यांनी या स्थलांतरास पूर्ण विरोध केलेला आहे आणि त्याची वाच्यताही केलेली आहे. त्यावर विमानतळ कंपनीचे धाष्ट्र्य असे की या विमान कंपन्यांस तुम्ही मुंबई विसरा हे सांगण्यापर्यंत संबंधितांची मजल गेली. याचा अर्थ अनेक कंपन्यांची मुंबई सेवा रद्द झाली, त्यामुळे मुंबईतील प्रवांशांस गैरसोय झाली तरी चालेल; पण आमच्या नवी मुंबई विमानतळावरील राबता वाढायला(च) हवा. प्रवाशांच्या मतांची फिकीर करण्याची परंपरा आपल्याकडे नसल्याने आणि त्याची गरजही कोणास वाटत नसल्याने त्यांना काय वाटते ही बाब कधीही समोर येणार नाही. तशी ती आल्यास सदरहू उद्योग समूहाचे कर्मचारी वगळल्यास अन्य सर्वांचाच विमान तळ बदलास विरोध असेल. उद्या वा परवा जेव्हा केव्हा नवी मुंबई विमानतळ पूर्ण सज्ज होईल तेव्हा प्रवासी त्याचा वापर स्वखुशीने करतील. पण त्यासाठी पुरेसा काळ जायला हवा आणि परिसराचा विकास व्हायला हवा. त्या अभावी तेथे जाण्याचा आग्रह धरणे म्हणजे केवळ घराच्या भिती बांधून उभ्या राहिल्या म्हणून तेथे राहण्याची जबरदस्ती करण्यासारखे आहे. घराला घरपण येण्यासाठी वीज, पाणी, वाहतूक आदींच्या बरोबरीने परिसरही नांदण्यायोग्य व्हावा लागतो.

पडणारा प्रत्येक थेंब जिथल्या तिथे जिरवा; भारतातील पूर आणि दुष्काळाची समस्या कायमची मिटवा!

निसर्गाचा लहरीपणा आणि मानवाचा निसर्गावरील वाढता हस्तक्षेप यामुळे आज संपूर्ण जग एका विचित्र आणि गंभीर हवामान संकटाचा सामना करत आहे. विशेषतः मराठवाडा आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा विचार करता, पाण्याचे हे दुहेरी संकट अत्यंत चिंताजनक आणि जीवघेणे बनले आहे. कधीकाळी दुष्काळी प्रदेश आणि टँकरवाडा अशी ओळख असलेल्या मराठवाड्यात गेल्या काही वर्षांपासून एकाच वर्षात दोन टोकाची संकटे पाहायला मिळत आहेत. पावसाळ्यात एकाच वेळी कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे शहरे आणि गावे पाण्याखाली जातात, ओढे-नाले तुडुंब भरून वाहतात, हातातोंडाशी आलेली पिके उद्ध्वस्त होतात आणि ओल्या दुष्काळाचे सावट पसरते. याउलट, पावसाळा संपून अवघे काही महिने उलटताच विहिरी तळ गाठतात, धरणे आटतात आणि उन्हाळ्यात घोटभर पाण्यासाठी नागरिकांना वणवण भटकावे लागते. एकाच वर्षात अतिवृष्टी आणि तीव्र पाणीटंचाई या दोन्ही समस्या निर्माण होण्यामागे एकच मूळ कारण आहेते म्हणजे पावसाचे पाणी जमिनीत न मुरता वाहून जाणे.

मराठवाडा आणि छत्रपती संभाजीनगरची बदलती जलस्थिती

भौगोलिकदृष्ट्या मराठवाड्याचे सरासरी वार्षिक पर्जन्यमान सुमारे ७०० ते ७५० मिमी इतके आहे. मात्र, जागतिक हवामान बदलामुळे पावसाचे वेळा-पत्रक पूर्णपणे कोलमडले आहे. पूर्वी चार महिने संततधार बरसणारा पाऊस आता केवळ काही दिवसांत आणि काही तासांतच १०० ते १५० मिमी इतका (ढगफुटीसदृश अतिवृष्टी) कोसळत आहे.

अतिवृष्टी आणि महापुराचे थैमान: मुसळधार पावसामुळे गोदावरी, पूर्णा, दुधना, शिवना या नद्यांसह स्थानिक ओढे-नाले तुडुंब भरून वाहतात. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड, सिल्लोड, वैजापूर, गंगापूर, पैठण यांसारख्या तालुक्यांमध्ये अतिवृष्टीमुळे लाखो हेक्टरवरील खरिपाची पिके, फळबागा आणि शेतकऱ्यांची अत्यंत सुपीक काळी माती वाहून गेल्याची उदाहरणे ताजी आहेत.

पाणीटंचाईचे भीषण वास्तव: दुसरीकडे, पावसाचे हे कोट्यवधी लिटर पाणी वाहून समुद्राला जाऊन मिळते आणि पावसाळा संपताच भूजलाची पातळी झपाट्याने खाली जाते. मे महिन्याच्या अखेरीस छत्रपती संभाजीनगरसह संपूर्ण मराठवाड्यात शेकडो गावे, वाड्या-वस्त्या आणि शहरातील अनेक वसाहतींना टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. केवळ जायकवाडीसारख्या मोठ्या धरणांवर अवलंबून राहण्यापलीकडे जाऊन स्थानिक पातळीवर भूजल साठा वाढवणे ही आज काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे.

वेगवान शहरीकरण आणि काँक्रीटीकरणाचे दुष्परिणाम

छत्रपती संभाजीनगर शहराचा औद्योगिक आणि नागरी विस्तार अत्यंत वेगाने होत आहे. बीड बायपास, वाळूज, सातारा-देवळाई, चिकलठाणा, शेंद्रा-बिडकीन (ऑरिक सिटी) या भागांत मोठ्या प्रमाणावर नवीन वसाहती, गृहप्रकल्प आणि औद्योगिक क्षेत्रे उभी राहिली आहेत. विकासाच्या या प्रक्रियेत सिमेंटचे रुंद रस्ते, पदपथांवरील पेव्हर ब्लॉक्स आणि काँक्रीटची जंगले उभी राहिली, परंतु पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यासाठी मोकळी जागाच शिल्लक राहिली नाही. परिणामी, शहरात तासभर जरी जोरदार पाऊस पडला तरी सखल भागांत, मुख्य चौकांमध्ये आणि नागरी वसाहतींमध्ये गुडघाभर ते कमरेइतके पाणी साचते. वाहने पाण्यात बुडतात आणि जनजीवन विस्कळीत होते. आपण ज्याला अतिवृष्टीचे संकट म्हणतो, ते प्रत्यक्षात खाम, सुखना यांसारख्या नैसर्गिक नद्या-नाल्यांवरील अतिक्रमणे, नाल्यांचे आकुंचन आणि पाण्याला जमिनीत जाण्याचा मार्ग बंद केल्यामुळे ओढवलेले मानवनिर्मित संकट आहे.

ग्रामीण भागातील आव्हाने आणि भूगर्भातील खडक रचना

ग्रामीण भागातील जलसंकट अधिक गुंतागुंतीचे आहे. मराठवाड्याच्या भूगर्भात प्रामुख्याने कठीण काळा पाषाण आढळतो. या कठीण खडकातून पावसाचे पाणी नैसर्गिकरीत्या जमिनीत मुरण्याचा वेग अत्यंत कमी (केवळ ५ ते ८ टक्के) असतो. त्यातच डोंगरउतारावरील बेसुमार जंगलतोड, नद्या-नाल्यांतील अनिर्बंध वाळू उपसा आणि ऐतिहासिक नहर-ए-अंबरीसारख्या पारंपरिक जलव्यवस्थापनाकडे झालेले दुर्लक्ष यामुळे पावसाचे पाणी जमिनीत न मुरता वेगाने वाहून जाते. जमिनीतील पाण्याचा उपसा मात्र अमर्याद सुरू आहे. आज ग्रामीण भागात ६०० ते ८०० फूट खोल बोअरवेल घेऊनही उन्हाळ्यात पाणी लागत नाही, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.

जिथल्या तिथे पाणी जिरवणे हाच एकमेव शाश्वत उपाय

पाण्याच्या या दुहेरी संकटावर (जास्त पाणी आणि कमी पाणी) मात करण्यासाठी बाह्य व खर्चिक उपाययोजनांपेक्षा ''पाणी अडवा, जिथल्या तिथे जिरवा'' हा मूलमंत्र प्रत्यक्ष कृतीत आणणे ही काळाची गरज आहे. गावातील आणि शहरातील पावसाचे पाणी जर त्या त्या परिसरातच जमिनीत मुरवले, तर एकाच वेळी दोन मोठे क्रांतिकारी बदल घडतात:

१. अतिवृष्टी व पुराचा धोका कायमचा टळतो: पावसाचे पाणी रस्त्यांवरून आणि शेतांतून वेगाने वाहून जाण्याऐवजी जागेवरच जमिनीत मुरल्याने नाले, ओढे आणि नद्यांवरील पाण्याचा अतिरिक्त ताण कमी होतो. यामुळे शहरांतील वसाहतींमध्ये पाणी शिरण्याची आणि ग्रामीण भागात नद्यांना येणाऱ्या महापुराची तीव्रता मोठ्या प्रमाणात नियंत्रणात येते.

२. दुष्काळ व टँकरमुक्त भविष्याची हमी: जमिनीत मुरलेले पाणी ही आपल्या भविष्याची सर्वात सुरक्षित जल बँक असते. यामुळे भूजलाची पातळी झपाट्याने वाढते. परिणामी, गावातील विहिरी, कूपनलिका (बोअरवेल), बारवा आणि पाझर तलाव उन्हाळ्यातही जिवंत राहतात. टँकरमुक्त मराठवाडा आणि पाणीटंचाईमुक्त शहर हे स्वप्न केवळ भूजल पुनर्भरणातूनच साकार होऊ शकते.

शहरी आणि ग्रामीण स्तरावर नेमके कोणते ठोस उपाय करावेत?

जलसंधारण ही केवळ शासकीय कागदपत्रांपुरती योजना न राहता ती व्यापक लोकचळवळ बनली पाहिजे. त्यासाठी पुढील अत्यंत व्यावहारिक आणि प्रभावी पावले उचलणे आवश्यक आहे:

खोलगट भागांत मोठ्या शोषखड्ड्यांची निर्मिती: गावांत आणि शहरांत ज्या ठिकाणी नैसर्गिकरीत्या खोलगट भाग आहे किंवा पावसाळ्यात जिथे पाणी साचते, अशा ठिकाणी मोठे खड्डे खोदून त्यामध्ये मोठे दगड, गिट्टी आणि वाळूचे (रेतीचे) थर भरून पावसाचे पाणी थेट जमिनीत जिरवता येते. या नैसर्गिक गाळणीमुळे स्वच्छ पाणी भूगर्भात जाते आणि सखल भागातील पाणी साचण्याची समस्या कायमची सुटते.

रस्त्याकडील नाल्यांचे शास्त्रोक्त नियोजन: आज रस्त्याच्या बाजूला बांधल्या जाणाऱ्या सिमेंटच्या बंदिस्त नाल्यांमुळे सर्व पाणी थेट नदीत किंवा शहराबाहेर वाहून जाते. त्याऐवजी नाल्यांची रचना अशी असावी की ज्या ठिकाणी नाल्यांचे पाणी एकत्र येते, तिथेच ठराविक अंतरावर मोठे शोषखड्डे करून ते पाणी जमिनीत जिरवले जाईल. याचा दुहेरी फायदा होईलरस्त्यांवर पाणी साचणार नाहीच, शिवाय रस्त्याच्या कडेला लावलेल्या झाडांना वर्षभर नैसर्गिक ओलावा मिळून त्यांना टँकरने पाणी घालण्याचा शासनाचा कोट्यवधी रुपयांचा खर्चही वाचेल.

गल्लीबोळ व मोठ्या इमारतींतील लाखो लिटर पाणी वाचवा: आज शहरातील प्रत्येक गल्लीतून वाहून जाणारे पाणी तसेच मोठमोठी शासकीय व खाजगी कार्यालये, शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, औद्योगिक वसाहती आणि गृहनिर्माण संस्थांच्या (सोसायटी) छतावरील लाखो लिटर शुद्ध पावसाचे पाणी नाल्यावाटे मैलोन्□मैल दूर वाहून जाते. एका १००० चौ. फुटांच्या छतावरून एका पावसाळ्यात सुमारे ६०,००० ते ७०,००० लिटर पाणी जमा होऊ शकते. हेच पाणी जर रेन वॉटर हार्वेस्टिंग आणि बोअरवेल पुनर्भरणाद्वारे जिथल्या तिथे अडवून जिरवले, तर उन्हाळ्यात तळपत राहणारी शहरे आणि गावे नक्कीच हिरवीगार व हरित होतील.

ग्रामीण भागातील जलसंधारण आणि लोकसहभाग: शेतातील पाणी शेतातच मुरवण्यासाठी शेततळी, बांधबंदिस्ती, डोंगरउतारावर समतल चर () आणि नाला बंडिंगची कामे लोकसहभागातून करणे आवश्यक आहे. गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार या मोहिमेतून गावच्या तलावांतील गाळ काढून त्यांची साठवण क्षमता वाढवावी, ज्यामुळे कठीण काळ्या पाषाणातील भेगांमधून भूजल पुनर्भरण होईल. तसेच ग्रामीण भागातील प्रत्येक घराच्या परसबागेत सांडपाणी आणि पावसाच्या पाण्यासाठी शोषखड्डे तयार करणे बंधनकारक करावे.

उपसंहार: लोकसहभाग आणि शासकीय इच्छाशक्तीची गरज

हे सर्व उपाय जर आपण प्रामाणिकपणे आणि शास्त्रोक्त पद्धतीने राबवले, तर गावे आणि उन्हाळ्यात तळपत राहणारी शहरे पुन्हा एकदा हरित होतीलच, शिवाय पाण्याची मुख्य समस्या कायमची कमी होईल, हे मी अत्यंत ठामपणे सांगू शकतो. निसर्ग आपल्याला दरवर्षी पुरेसे पाणी देतो, पण त्याचे योग्य व्यवस्थापन करण्यात आपण कमी पडतो. पाऊस पाडणे आपल्या हातात नसले, तरी आकाशातून पडलेला प्रत्येक थेंब जिथल्या तिथे जमिनीत जिरवणे आपल्या हातात नक्कीच आहे.

फक्त यासाठी सर्व भारतीयांनी स्वतः पुढाकार घेणे आणि शासनाने धोरणात्मक व आर्थिक पाठबळ देऊन खंबीरपणे पाठीशी राहणे गरजेचे आहे. जलसंधारण हे प्रत्येक सुजाण नागरिकाचे नैतिक कर्तव्य आहे. आज आपण पावसाच्या पाण्याचा सन्मान करून ते जमिनीच्या पोटात साठवले, तरच उद्याचा मराठवाडा आणि संपूर्ण भारत पूर आणि दुष्काळाच्या संकटातून मुक्त होऊन खऱ्या अर्थाने सुजलाम् सुफलाम् होईल!



लेखक: प्रा. ज्ञानेश्वर पंडितराव घुले
(अध्यक्ष, सरस्वती सेवाभावी बहुउद्देशीय संस्था / जिल्हा प्रतिनिधी, दैनिक जगमित्र, छत्रपती संभाजीनगर)
मो.न. : ९८५०८०२०२२

पान १ वरून....

क्रिस्टल कंपनी

यामुळे नागरिकांना अस्वच्छतेचा सामना करावा लागत आहे, परळी आगारातील अनागोंदी व मनमानी कारभाराकडे लक्ष देऊन राज्याच्या परिवहन मंत्र्यांनी कारवाई करण्याची मागणी प्रवाशी नागरिकांनी केली आहे. याबाबत सविस्तर वृत्त कि,परळी आगारात मागील अनेक महिन्यापासून आगाराची संपूर्ण स्वच्छता करण्यासाठी व प्रवाशी बसेसची स्वच्छता ठेवण्यासाठी क्रिस्टल नावाच्या कंपनीला परिवहन विभागा मार्फत स्वच्छतेचे काम देण्यात आलेले आहे,परंतु परळी आगारात काम पाहणाऱ्या व्यक्तीने व आगारप्रमुख यांनी संगनमत करून प्रत्येक १० बस मागे एक स्वच्छता कर्मचारी असा नियम असताना व त्या कर्मचाऱ्याने संपूर्ण बसची स्वच्छता ठेवणे आवश्यक असताना तसे न करता आगार प्रमुख यांनी जाणीवपूर्वक स्थानिक पातळीवर मिलीभगत केली आहे,त्यामुळे परळी आगारात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता आहे,तसेच कोणतीही प्रवाशी बस स्वच्छ नसते,त्यामुळे प्रवाश्यांना अस्वच्छतेचा सामना करावा लागतो,प्रवाशी नागरिकांनी या अस्वच्छतेची तक्रार केली तरी आगार प्रमुखाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष असल्याने नागरिकांना आगारात त्रास सहन करावा लागतो,परळी आगारात मागील काही महिन्यापासून मोठ्या प्रमाणात मनमानी व अनागोंदी कारभार सुरु असून या संपूर्ण कारभाराची राज्याचे परिवहन मंत्र्यांनी दखल घेऊन कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

शेवटच्या पानावरून...

अग्रीमपासून वंचित!

आहे. मात्र, या अडचणी दूर करण्याची जबाबदारी शासन आणि प्रशासनाची आहे. शेतकऱ्यांना कार्यालयांचे उंबरठे झिजवायला लावण्याऐवजी विशेष मोहीम राबवून सर्व पात्र लाभार्थ्यांची कागदपत्रे व तांत्रिक अडचणी तातडीने पूर्ण कराव्यात, असेही माने यांनी म्हटले.

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही सरसकट कर्जमाफी द्या!

दरम्यान, राज्य सरकारने अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतच्या थकीत कर्जासाठी कर्जमाफीची प्रक्रिया सुरू केली आहे. मात्र, नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळत नसल्याने त्यांच्यावर अन्याय होत आहे. वेळेवर कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्याऐवजी त्यांनाही दोन लाख रुपयांपर्यंतच्या सरसकट कर्जमाफीचा लाभ द्यावा. ५० हजार रुपयांच्या प्रोत्साहन अनुदानाची अट रद्द करून नियमित कर्जदार शेतकऱ्यांचाही कर्जमाफी योजनेत समावेश करावा, अशी मागणी उत्तमराव माने यांनी केली आहे. एकीकडे दुष्काळाचे संकट, दुसरीकडे शेती उत्पादनातील घट आणि वाढता कर्जाचा बोजा यामुळे शेतकरी अडचणीत आहे. अशा परिस्थितीत नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदानापुरते मर्यादित न ठेवता त्यांनाही कर्जमाफीचा न्याय द्यावा. शासनाने केवळ घोषणा न करता सर्व शेतकऱ्यांना समान न्याय देणारे निर्णय तातडीने घ्यावेत, असेही शेतकरी नेते उत्तमराव माने यांनी स्पष्ट केले.

.....

नागरिक त्रस्त

चौक ते चेंबरी रेस्ट हाऊस ते गोपीनाथराव मुंडे चौक पर्यंत रोड मंजूर असून अदयाप पर्यंत झालेला नाही,त्यामुळे चौकातील रस्त्यावर खूप मोठया प्रमाणात खड्डे पडले असून त्यात नालीचे घाण पाणी साचत आहे. त्यामुळे या परिसरात विविध साथीचे आजार तसेच डेंग्यूची भीती आहे,रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रशासनाने तातडीने खड्डे,स्वच्छता व पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे.

बाहेरून परळीत येणाऱ्या नागरिक व भाविकांचे घाण पाण्यातून मार्ग काढत स्वागत होत आहे, अशी परिस्थिती निर्माण झाली असून,परळी शहराची प्रतिमा अत्यन्त खराब होत असल्याचे बालाजी चाटे यांनी म्हटले आहे. विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि वाहनचालकांना दररोज या घाण पाण्यातुन मार्ग काढावा लागतं असून अपघाता सारख्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. नगरपरिषद व संबंधित प्रशासनाने या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करून नालीच्या पाण्याचा कायमस्वरूपी निचरा करावा, रस्त्यावर साचलेले पाणी हटवावे तसेच परिसराची स्वच्छता करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते बालाजी चाटे यांनी केली आहे.

.....

आशीर्वादावर?

असल्याचा आरोप होत असताना प्रशासनाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या नगरसेविका अश्विनी दशरथ धोंगडे यांनी ३० जुलै २०२६ रोजी महापालिका आयुक्तांकडे लेखी तक्रार दाखल करून महात्मा फुले मार्केटच्या टेरेसवरील 'कॉपर अँड कोल (स्काय बार)' बिअर बारची परवानगी तात्काळ रद्द करण्याची मागणी केली होती. महात्मा फुले यांनी शिक्षण, समता, सामाजिक न्याय आणि नैतिक मूल्यांच्या प्रसारासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. अशा महापुरुषांच्या नावाने असलेल्या सार्वजनिक इमारतीवर मद्यविक्रीचा व्यवसाय सुरू असणे त्यांच्या विचारांचा अवमान करणारे असल्याची भूमिका धोंगडे यांनी मांडली होती. या प्रकारामुळे नागरिक, महिला, विद्यार्थी आणि व्यापारी वर्गामध्ये नाराजी असल्याचेही त्यांनी निवेदनात नमूद केले होते. या तक्रारीनंतर महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालय क्रमांक ३, शिवाजीनगर यांनी १२ ऑगस्ट २०२६ रोजी पत्र क्रमांक ३५३/२०२६ अन्वये दिलेल्या उत्तरात संबंधित ठिकाणी बिअर बार चालविण्यास त्यांच्या कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारची परवानगी देण्यात आलेली नसल्याचे स्पष्ट केले. तसेच हे प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी महापालिकेच्या मालमत्ता विभागाकडे वर्ग करण्यात आल्याचेही कळविण्यात आले. यामुळे आता प्रश्न निर्माण झाला आहे की, संबंधित क्षेत्रीय कार्यालयाने परवानगी दिलेली नसताना सार्वजनिक मार्केटच्या टेरेसचा व्यावसायिक वापर नेमक्या कोणत्या आदेशाने मंजूर करण्यात आला? मालमत्ता विभागाने जागा वापरण्याची परवानगी दिली आहे काय? अग्निशमन विभागाची ना-हरकत आहे काय? राज्य उत्पादन शुल्क विभागाचा वैध मद्यविक्री परवाना आहे काय? आणि या सर्व परवानग्यांची महापालिकेने प्रत्यक्ष पडताळणी केली आहे काय? या प्रकरणात समाधानकारक कार्यवाही होत नसल्याचा आरोप करीत अश्विनी धोंगडे यांनी ९ सप्टेंबर २०२६ रोजी महापालिका आयुक्तांकडे पुन्हा लेखी तक्रार दाखल केली. संबंधित बारची तात्काळ प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा करावा, महापालिका, मालमत्ता विभाग, अग्निशमन विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि पोलीस विभागाच्या अधिकाऱ्यांचे संयुक्त तपासणी पथक स्थापन करावे, अशी मागणी त्यांनी केली. आवश्यक परवानग्या नसतानाही व्यवसाय सुरू असल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधित आस्थापना बंद अथवा सील करण्याची कायदेशीर कार्यवाही करावी. तसेच खोटी माहिती, बनावट कागदपत्रे किंवा अधिकाऱ्यांचे संगनमत आढळल्यास संबंधितांविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील लागू तरतुदींनुसार फौजदारी गुन्हे दाखल करून विभागीय कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. सर्वसामान्य नागरिकाला छोट्याशा दुकानासाठी अथवा बांधकामासाठी महापालिकेच्या विविध विभागांचे उंबरठे झिजवावे लागतात. कागदपत्रे, मंजुऱ्या आणि नियमांच्या नावाखाली अनेक अडथळे पार करावे लागतात. मग महात्मा फुले मार्केटसारख्या सार्वजनिक इमारतीच्या टेरेसवर सुरू असल्याचे सांगितल्या जाणाऱ्या बिअर बारच्या बाबतीत सर्व नियमांची पूर्तता झाली आहे काय, हे प्रशासनाने स्पष्ट करणे आवश्यक आहे. क्षेत्रीय कार्यालयाने परवानगी दिलेली नसल्याचे उत्तर म्हणजे संबंधित व्यवसाय पूर्णपणे अनधिकृत असल्याचा अंतिम पुरावा नसला, तरी या उत्तरानंतर इतर सक्षम प्राधिकरणांनी दिलेल्या मंजुऱ्या सार्वजनिक करणे ही महापालिकेची जबाबदारी ठरते. महात्मा फुलेंच्या जयंतीला त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करणे, त्यांच्या विचारांवर भाषणे ठोकणे आणि सामाजिक समतेचे गोडवे गाणे सोपे आहे; मात्र त्यांच्याच नावाने असलेल्या सार्वजनिक वास्तूच्या वापराबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांना उत्तर देण्याची वेळ आली की प्रशासनाने मौन बाळगणे योग्य ठरणार नाही. महापालिकेच्या मालमत्तेचा वापर कोणत्या अटींवर होत आहे, त्यातून महापालिकेला किती महसूल मिळतो आणि संबंधित आस्थापनेला आवश्यक परवानग्या कोणी दिल्या, याचा संपूर्ण हिशेब जनतेसमोर आला पाहिजे. आता महापालिका आयुक्तांनी या प्रकरणात स्वतः लक्ष घालून सर्व परवानग्यांची निष्पक्ष चौकशी करावी, संबंधित कागदपत्रे तपासावीत आणि नियमभंग आढळल्यास दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पुढे आली आहे. कारण हा प्रश्न केवळ एका बिअर बारचा नाही, तर सार्वजनिक मालमत्तेच्या संरक्षणाचा, प्रशासकीय पारदर्शकतेचा आणि कायद्याच्या समान अंमलबजावणीचा आहे. महात्मा फुलेंच्या नावाची पाटी लावून त्यांच्या विचारांचा सन्मान होत नाही; त्यांच्या नावाने असलेल्या सार्वजनिक मालमत्तेचा कारभारही नियमाने आणि पारदर्शकपणे चालला पाहिजे. आता महापालिका प्रशासन या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावणार की फाइल एका टेबलावरून दुसऱ्या टेबलावर फिरत राहणार, याकडे नांदेडकरांचे लक्ष लागले आहे! सदर वृत्त उपलब्ध तक्रारी व महापालिकेच्या पत्रव्यवहारावर आधारित असून संबंधित बार व्यवस्थापनाची बाजू, इतर विभागांच्या परवानग्या आणि अंतिम चौकशी निष्कर्षांची स्वतंत्र पुष्टी झालेली नाही.

.....

बिरसा मुंडा

शिक्षणाच्या माध्यमातून स

16 Nov 2026 jalna page 3_Layout 1 11/15/2026 11:17 PM Page 1

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

विष्णू निवृत्ती कदम
(संपादक जालना, आवृत्ती), ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

PRGI.No.- MHMAR/25/A2848

जालना | सोमवार दि.१६ नोव्हेंबर २०२६ | पान ३

जिल्हा कोषागार कार्यालयात निवृत्ती वेतनधारकांसाठी १७ ते २७ नोव्हेंबर दरम्यान विशेष शिबिर

जालना/जिमाका

जिल्ह्यातील निवृत्ती वेतनधारक आणि कुटुंब निवृत्ती वेतनधारकांसाठी १७ ते २७ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत जिल्हा कोषागार कार्यालय, जालना येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये निवृत्ती वेतनधारकांचे ऑनलाइन हयात प्रमाणपत्र (लाईफ सर्टिफिकेट) तयार करून देण्यात येणार आहे. याबाबत जिल्हा कोषागार कार्यालयाच्या वतीने माहिती देण्यात आली. शिबिराचा लाभ घेण्यासाठी निवृत्ती वेतनधारकांनी आपले आधार कार्ड, पीपीओ क्रमांक (PPO Number) आणि बँक खाते पुस्तिका सोबत आणावी. ऑनलाइन हयात प्रमाणपत्र तयार करण्याची प्रक्रिया शिबिरामध्ये पूर्ण करण्यात येणार आहे.

ऑनलाइन हयात प्रमाणपत्र सादर झाल्यानंतर संबंधित निवृत्ती वेतनधारकांना डिसेंबर २०२६ चे निवृत्ती वेतन अदा करण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व निवृत्ती वेतनधारक आणि कुटुंब निवृत्ती वेतनधारकांनी जिल्हा कोषागार कार्यालय, जालना येथे आयोजित या विशेष शिबिरात उपस्थित राहून या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी राजू डोके यांनी केले आहे.

जालना जिल्ह्यातील न्यायालयीन कर्मचारी १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपावर!

राज्यातील ३४ हजार कर्मचाऱ्यांचा आंदोलनात सहभाग; न्यायालयीन कामकाज ठप्प होण्याची शक्यता

जालना/प्रतिनिधी

राज्यातील दुय्यम न्यायालयांमध्ये कार्यरत न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघ आणि जिल्हास्तरीय न्यायालयीन कर्मचारी संघटनांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. समान काम-समान वेतन या तत्त्वानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी राज्यातील सुमारे ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी १७ नोव्हेंबर २०२६ पासून बेमुदत संपावर जाणार आहेत. या आंदोलनात जालना जिल्ह्यातील जिल्हा व तालुका न्यायालयांमधील कर्मचारीही सहभागी होणार असल्याने जिल्ह्यातील न्यायालयीन कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

माननीय उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतन-नश्रेणी लागू करावी, ही मागणी गेल्या अनेक महिन्यांपासून प्रलंबित आहे. यासंदर्भातील प्रस्ताव ३१ जानेवारी २०२५ रोजी मुंबई उच्च न्यायालयामार्फत राज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात आला होता. मात्र, अद्याप शासनाकडून ठोस निर्णय घेण्यात आलेला नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

विशेष म्हणजे, न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी यापूर्वी शांततेच्या मार्गाने आंदोलन करून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, मागण्यांची दखल घेतली जात नसल्याने आता बेमुदत संपाचे हत्यार उपसण्यात आले आहे. या संपात जालना जिल्ह्यातील लिपिक, लघुलेखक, बेलिफ, वाहनचालक, शिपाई आणि सफाई कर्मचारी यांच्यासह विविध संवर्गांतील कर्मचारी सहभागी होणार असल्याचे जालना जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

सर्पमित्र रामेश्वर शहा यांनी सहा फुटाचे अजगर पकडले



जालना/प्रतिनिधी : जालना तालुक्यातील मौजे जामवाडी शिवारात दुपारच्या वेळेला गणेश वडदे यांच्या शेतात पाणी देत असताना पाण्याच्या शोधात असलेला सहा फूट आकाराचा अजगर जातीचा साप शेतात आढळल्याने जामवाडी शिवारात एकच खळबळ उडाली गणेश वडदे यांनी सर्पमित्र रामेश्वर कांतीलाल शहा व सहकारी आकाश रणवे यांच्याशी संपर्क साधला व रामेश्वर शाह यांनी लगेच त्या ठिकाणी जाऊन तो अजगर पकडून जंगलामध्ये त्याच्या नैसर्गिक वातावरणात सोडून देण्यात आला आहे ज्याची लांबी सहा फूट व वजन ५:३० किलो असे सांगण्यात आले आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे नदी नाल्यांना विहिरीला कुठे ही पाणी नसल्या मुळे वन्य प्राण्यांची मोठ्या प्रमाणात जीवित हानी होत असल्याने शासनाने जंगलामध्ये वन्य प्राण्यांसाठी पानवाठी निर्माण करण्याची मागणी नागरिकांमधून केली जात आहे. सर्पमित्र रामेश्वर सह व त्याच्या सहकार्याचे गावकऱ्यांनी कौतुक करून सत्कार केला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांना अभिवादन

जालना, दि.१५ (जिमाका) : क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी प्र. तहसीलदार तुषार निकम, नायब तहसीलदार विक्रांत मुंढे, नायब तहसीलदार किशोर तायडे, सहाय्यक महसूल अधिकारी संपदा कुलकर्णी, अतुल केदार, राहुल खंदारे, राहुल देशपांडे, दिलीप दाभाडे, सुनिल काळुंके यांच्यासह उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

भाजपा जालना महानगर ची सोमवारी राष्ट्रचिंतन संवाद बैठक...

विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी राष्ट्रचिंतन संवाद बैठकीस मोठ्या संख्येने सहभागी व्हावे-भास्कर आबा दानवे

जालना/प्रतिनिधी

लोकशाही वाचवा, अराजकता हटवा या अभियानांतर्गत भारतीय जनता पार्टी, जालना महानगरच्या वतीने सोमवार, दि. १६ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११.०० वा, भाजपा जिल्हा कार्यालय जालना येथे राष्ट्रचिंतन संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत खासदार डॉ. अजितजी गोपछडे, माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर हे मार्गदर्शन करणार आहे. या राष्ट्रचिंतन संवाद बैठकीस जालना शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती राहणार आहे. यामध्ये आडत व्यापारी, कंत्राटदार, चार्टर्ड अकाउंटंट (), डॉक्टर्स, इंजिनीअर, पत्रकार, प्राध्यापक, वकील तसेच व्यापारी व उद्योगपती यांचा समावेश असणार आहे. सध्याच्या सामाजिक व राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर लोकशाहीचे महत्त्व, संविधानिक मूल्यांचे जतन, राष्ट्रहिताचे विचार आणि समाजातील सकारात्मक संवाद अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने या राष्ट्रचिंतन संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीस, आ. नारायण कुचे, आ. संतोष पाटील दानवे, मा.आ. कैलासगोरंट्याल, राहुल भैया लोणीकर, विलासबापू खरात, सतीश घाटगे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, सभापती अशोक पांगारकर तसेच महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष शुभांगीताई देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या बैठकीस भाजपा जालना महानगरातील सर्व पदाधिकारी, मंडळ अध्यक्ष, विविध आघाड्या व मोर्चांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच राष्ट्रभक्त प्रेमी, भाजपा प्रेमी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी केले आहे

परतूर तालुक्यातील लिंगसा येथे बिरसा मुंडा यांची १५१वी जयंती मोठ्या साजरी



परतूर/प्रतिनिधी

आदिवासी समाजाचे महान क्रांतिकारक, स्वातंत्र्यसेनानी आणि जननायक भगवान बिरसा मुंडा यांची जयंती परतूर तालुक्यात मोठ्या उत्साहात व थाटामाटात साजरी करण्यात आली.

यावेळी भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी त्यांनी केलेल्या संघर्षाची माहिती दिली.

भगवान बिरसा मुंडा यांनी समाजाला एकजुटीचा, स्वाभिमानाचा आणि अन्यायाविरुद्ध लढण्याचा संदेश दिला. त्यांचे विचार व कार्य आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आहेत, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. या जयंती सोहळ्याला परिसरातील नागरिक, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी सरपं रमेश नाना गायकवाड,माजी उपसरपंच इंद्रजीत डवले,आशासेविका संगिता ताई पवार,राधीकाताई डवले, अंगणवाडी सेविका राजेश्री विभूते यस टी समाजसेवीका सरुबाई गायकवाड,, राजेश मणधरने, संजय दळवे रामप्रसाद खूळे,ग्रामपंचायत ओपरेटर विष्णू डासाळकर,पाणीपुरवठा साहाय्यक लक्ष्मन राठोड, ग्रामपंचायत चे सेवक,हनूमान पिसाळे उत्साहपूर्ण वातावरणात जयंती सोहळा संपन्न झाला.

रिपब्लिकन सेनेचा २८ वा वर्धापन दिन सोहळा शनिवारी जालन्यात साजरा होणार

जालना/प्रतिनिधी

रिपब्लिकन सेनेचा २८ वा वर्धापन दिन सोहळा शनिवार दि.२१ नोव्हेंबर २०२६रोजी दुपारी ४ वाजता जालना शहरातील गोल्डी लॉन्स येथे आयोजित करण्यात आला असून सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते या वर्धापन दिन सोहळ्याचे उद्घाटन होणार असल्याची माहिती या वर्धापनदिन सोहळ्याचे अध्यक्ष तथा रिपब्लिकन सेनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष डॉ. सुशील सूर्यवंशी यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली.

हॉटेल सात्विक भोज येथे आयोजित या पत्रकार परिषदेस रिपब्लिकन युवा सेनेचे मराठवाडा अध्यक्ष दिनेश आदमाने , माजी जिल्हाध्यक्ष लिंबाजी वाहुळकर, सतीश वाहुळे,मच्छिंद्र खरात, जितेंद्र उघडे, समाधान खरात, भीमराज खरात, संघर्ष पंडित, आनंद म्हसके,राजू सावंत आदींची उपस्थिती होती.

पत्रकार परिषदेत अधिक माहिती देतांना डॉ. सुशील सूर्यवंशी यांनी पुढे सांगितले की, उपेक्षीत - वंचित घटकांचे प्रश्न हाती घेऊन



ते सोडविण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर आधारीत रिपब्लिकन सेनेची स्थापना सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांनी २१ नोव्हेंबर १९९८ रोजी केली होती. २७ वर्षापासून रिपब्लिकन सेना उपेक्षीत वंचित घटकांचे प्रश्न सोडविण्याचे तसेच या समाज घटकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे परिवर्तनवादी विचार रूजविण्याचे कार्य करीत आहे.

रिपब्लिकन सेनेचा २८ वा वर्धापन दिन सोहळा शनिवार दि. २१नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी ४ वाजता जालना शहरातील गोल्डी लॉन्स येथे आयोजित करण्यात आला आहे. सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते या वर्धापन दिन सोहळ्याचे उद्घाटन होणार असून रिपब्लिकन युवा सेनेचे युवा नेते ॲड. अमन आंबेडकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या सोहळ्यास राष्ट्रीय महासचिव संजिव बोंधनकर, केंद्रीय कोषाध्यक्ष आकाश कांबळे, केंद्रीय सदस्य प्रा. जगन्नाथ बाबा, केंद्रीय सदस्य प्रा. युवराज धसवाडीकर, प्रदेश उपाध्यक्ष यशवंत भालेराव, किरण घोंगडे, प्रदेश महासचिव विनोद काळे, सोमनाथ भोसले, प्रदेश संघटक आनंद मोहन, प्रदेश प्रसिध्दी प्रमुख अविनाश शिंदे, प्रदेश सदस्य अरूण रामराजे, युसूफ सय्यद, अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेशाध्यक्ष शपिक शेख, विद्यार्थी आघाडीचे प्रदेश अध्यक्ष विवेक बनसोडे, वाहतूक सेनेचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब वाहुळ, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष रमेश उबाळे, विदर्भ अध्यक्ष प्रफुल्ल शेंडे, मराठवाडा निमंत्रक विजय साळवे आदींची उपस्थिती राहणार आहे.

या वर्धापन दिन सोहळ्यानिमित्त विशेष सभेचे आयोजन करण्यात आले असून गायरान जमिनी प्रत्यक्ष करणाऱ्यांच्या नावे झाल्या पहिजेत यावर या सभेत धोरणात्मक मांडणी केली जाणार आहे. महाराष्ट्रातील गंभीर दुष्काळी परिस्थितीवर सखोल चर्चा व उपाय योजना तसेच वेगाने होणारा पर्यावरणाचा ऱ्हास आणि त्यावरील उपाय योजना यावर चर्चा होणार असून सर्व आर्थिक विकास महामंडळातर्फे देण्यात आलेली बँकेची कर्जे तसेच मायक्रो फायन्सास कंपन्या व बचत गटांची कर्जे सरसकट माफ करण्यात यावी असा ठराव यावेळी संमत करण्यात येणार आहे. याशिवाय सामाजिक उपवर्गीकरणावरही चर्चा होणार आहे.या वर्धापन दिन सोहळ्यास पाच हजार पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार असल्याचे डॉ. सूर्यवंशी यांनी सांगितले.

राधाई महाविद्यालयात १५७ शिक्षकांना निवड श्रेणी प्रशिक्षण

नांदेड/प्रतिनिधी

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था तथा शिक्षण विभाग जिल्हा परिषद नांदेड यांच्या आदेशानुसार गटसाधन केंद्र पंचायत समिती लोहा यांच्या वतीने सेवेचे २४ वर्षे पूर्ण झालेल्या शिक्षक शिक्षिकांचे निवड श्रेणी प्रशिक्षण दिनांक १५ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. विविध उद्दिष्टांच्या परिपुर्तीसाठी तिन्ही कुलांमधून कंधार व लोहा तालुक्यातील पात्र असलेले

एकूण १५७ प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेत असून लोहा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी संतोष गंगाजी यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण सुरु आहे. पहिल्याच दिवशी गटशिक्षणाधिकारी संतोष गंगाजी तसेच शिक्षण विस्तार आधिकारी सतीश व्यवहारे यांनी भेट देऊन संवाद साधला. यावेळी सुलभक डॉ. नागोराव जाधव, दत्तात्रय कांबळे, संभाजी वाघमारे, गंगाधर ढवळे, समीर शेख, धोंडीबा वाघमारे, रंगनाथ राठोड, तुकाराम मुंगरे, शेख फारुख, संजय अकोले, हावगीराव जामकर, बाळु चव्हाण तसेच तंत्रस्नेही शिक्षक विठ्ठल बरूरे, राजारुपे यांची उपस्थिती होती.

दहा दिवसांच्या कालावधीत प्रशिक्षणार्थींना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२०, राष्ट्रीय



अभ्यासक्रम आराखडा यांची माहिती, शिक्षण हक्क कायदा २००९, सर्वसमावेशक शिक्षण व विविध शासकीय योजना प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी प्रशिक्षणार्थींना प्रोत्साहित करणे, शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडानुसार शाळेचा गुणवत्तापूर्ण दर्जा सुधारण्यासाठी मार्गदर्शन करणे, अध्ययन - अध्यापन प्रक्रियेत एकात्मिक व सर्वसमावेशक पद्धतीसाठी कौशल्ये व भारतीय ज्ञान परंपरेद्वारे अध्यापनशास्त्रीय दृष्टिकोन विकसित करणे, शालेय प्रशासन, शालेय नियोजन व शालेय व्यवस्थापन या विषयांची अद्ययावत माहिती देण्याची प्रक्रिया यशस्वीपणे सुरू आहे.

तसेच शालेय समस्या सोडवण्यासाठी प्रकल्प, उपक्रम, कृतीसंशोधन यांचे महत्त्व विशद करणे, मूल्यमापनातील विविध पद्धती वापरून विद्यार्थ्यांच्या समग्र मूल्यमापनाची माहिती देणे, शालेय कामकाजात सुलभता व गतिमानता आणण्यासाठी माहिती तंत्रज्ञान व ऑनलाइन स्रोतांचा उपयोग करण्यास सक्षम करणे, प्रशिक्षणार्थ्यांच्या स्वतःच्या सर्वांगीण व्यावसायिक विकास साधण्यासाठी प्रोत्साहित करणे, विषयानिहाय गटचर्चेतून अध्ययन-अध्यापन मूल्यमापनातील समस्यांचे निराकरण करणे आदी उद्दिष्टांच्या परिपुर्ती करण्यासाठी दररोज सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत प्रशिक्षण सुरू आहे. यासाठी शिविअ विठ्ठल आचणे, सहनियंत्रक बी.टी केंद्रे, प्रशिक्षण समन्वयक म्हणून संजय अकोले नियोजन करीत आहेत.

सरपंचांचा माणुसकीचा उपक्रम! स्वखर्चातून केली हातपंपांची दुरुस्ती





परतूर/पिराजी गायकवाड

परतूर, परतूर तालुक्यातील सेलगाव लिपने येथील माजी सरपंच यांनी जनतेला दिलासा मिळवून दिला,सरपंचांचा माणुसकीचा उपक्रम! स्वखर्चातून केली हातपंपांची दुरुस्ती; ग्रामस्थांना मिळाला पाणीप्रश्नातून दिलासा गावाच्या विकासासाठी केवळ पद नव्हे, तर सामाजिक बांधिलकी महत्त्वाची असते, याचा आदर्श ग्रामपंचायत सरपंच यांनी घालून दिला आहे.

गावातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी होणारा त्रास लक्षात घेऊन ग्रामपंचायत सरपंच यांनी स्वतःच्या खर्चातून गावातील बंद पडलेल्या हातपंपांची दुरुस्ती करून घेतली. त्यामुळे ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला असून सरपंचांच्या या सामाजिक कार्याचे गावकऱ्यांकडून कौतुक होत आहे.या गावात गेली सहा महिने झाले प्रशासक लागू आहे ना धड ग्रामसेवक लक्ष देत नाही व माझी सरपं पण लक्ष देत नाही जनतेने जायचे कोणाकडे गावातील नागरिकांची पाण्यासाठी होणारी गैरसोय दूर व्हावी आणि सर्वसामान्यांना पिण्याचे पाणी सहज उपलब्ध व्हावे, या उद्देशाने सरपंचांनी कोणत्याही शासकीय निधीची वाट न पाहता स्वखर्चातून हा उपक्रम राबविला.

लोकप्रतिनिधी म्हणून केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष कृतीतून जनतेची हपस्याच्या दूरुस्तीसाठी हाजर राहून काम करुण घेताना, माजी सरपंच गजानन लिपने सोनू मूसळे, राजू लाटे, संजू लिपने, तातेराव लिपने, परमेश्वर लिपने, व्यंकटेश लिपने, शेख नान्नू, शेख भैय्या, वा कशी करावी, याचे उत्तम उदाहरण सरपंचांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले आहे. त्यांच्या या पुढाकाराचे ग्रामस्थांकडून अभिनंदन आणि कौतुक केले जात आहे.

महाराष्ट्रातील निर्भिड दैनिक
जगमित्र
संतोष सोनवणे (लातूर जिल्हा प्रतिनिधी)
मो.9673158719
PRGI.No.- MHMAR/26/A2511
लातूर जिल्हा आवृत्ती — सोमवार दि.१६ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ४



कार्यसम्राट आमदारांच्या कार्यक्षेत्रात रस्त्याचे आता वाजले की...!

उटी लखनगाव आलमला प्रवास नको रे बाबा...एक ते दीड वर्षापासून प्रवाशी, विद्यार्थ्यांचे हाल...

बी डी उबाळे

औसा: औसा तालुक्यातील अनेक रस्त्यांची दयनीय अवस्था झाली असतानाच जवळपास गेल्या दीड ते दोन वर्षापासून उटी,लखनगाव, आलमला या रस्त्याची अत्यंत दयनीय दुर्दैवी अवस्था झाली असून या रस्त्यावरून मोठमोठे खड्डे पडलेले आहेत तर डांबरीकरणाचे डांबर निघून गेल्याने अनेक ठिकाणी खडी उघडी पडली आहे. तर एक प्रकारचा लोकप्रतिनिधींचा हा विकासच उघडा पडल्याचेही बोलले जात आहे. ज्यामुळे प्रवास करताना प्रवासी नागरिकांचे शालेय विद्यार्थ्यांचे मोठे हाल होत असल्याचे चित्र सध्या या रस्त्यावरून प्रवास करीत असताना दिसून येत आहे. तर आज संबंध महाराष्ट्रामध्ये आणि संपूर्ण लातूर जिल्ह्याची विकासात्मक कार्याची धुरा आपल्या खांद्यावर घेणारे कार्यसम्राट आमदार म्हणून प्रसिद्धी पत्रकाद्वारे मिळविली पण प्रत्यक्षात कार्यक्षेत्रावर मात्र प्रसिद्धी आहे त्याचे मोल करावे अशी परिस्थिती प्रत्यक्षरीत्या जमिनीवर दिसून येत नाही काय? तर कार्य सम्राटांनी संपूर्ण लातूर जिल्ह्यासह महाराष्ट्र मध्ये मोठ्या प्रमाणात आपल्या कार्याची छाप निर्माण केली आहे परंतु काखेत कळसा आणि गावाला... याप्रमाणे जवळपास गेल्या दोन वर्षापासून आयुष्यापासून सुरू झालेल्या या रस्त्यावर पावसाळ्यामध्ये या रस्त्यावरील फुलाचे निर्मिती होणे अत्यावश्यक होते परंतु गेल्या दोन वर्षापासून तेही झाले नाही कारण पाऊस थोडाही पडतात या ठिकाणी या गावचा रस्ता बंद होतो आणि त्यास पूलाच्या ठिकाणी एक तरुण नागरिक आपला जीव गमावता गमावता त्याचे नशीब बलवत्तर म्हणून तो वाचला परंतु त्यानंतरही हे काम तातडीने पूर्ण करणे आवश्यक होते परंतु अद्याप पर्यंत ते न झाल्याने या भागातील शेतकरी नागरिक आणि आलमला येथील शैक्षणिक पंढरी समजले जाणाऱ्या शिक्षण संस्थेमध्ये हजारो विद्यार्थी दैनंदिन औसा ते अलमला प्रवास करतात ते त्या कॉलेजच्या वाहनाने आणि खाजगी ही वाहनाने मोठ्या प्रमाणात प्रवास करतात परंतु हा रस्ता दुरुस्त न झाल्याने कार्यसम्राट आमदारांच्या विकासात्मक धोरणावर नागरिकाकडून शंका



व्यक्त केली जात आहे आणि हा विकास नेमका कुठे आणि कसा होतोय आडतोय? याबाबतही चर्चा केली जात आहे.यामुळे कार्यसम्राट आमदारांनी आपल्या शहरालगत असलेला रस्ता त्वरित त्याचे काम सुरू करून या शैक्षणिक पंढरीला आणि तीन ते चार गावच्या नागरिकांना या रस्त्यापासून चांगले दिवस निर्माण व्हावे याकरिता हा रस्ता ताबडतोब दुरुस्त करून घ्यावा आणि नागरिकांचे होणारे हाल थांबवावे कारण या रस्त्यावर अनेक शेतकऱ्यांची शेती याच रस्त्यावर असुन औसा शहरातील शेतकरी असल्याने ते ही या शेतीकडे जात असताना हा अत्यंत खराब रस्ता पाहता नागरिकांमध्ये आमदारांच्या कार्याबाबत नक्कीच वैचारिकता निर्माण होते आणि आमदार नेमका कुठे आणि कसा आणि कोणासाठी विकास करतायेत याबाबतही सोशल मीडियावर अनेक व्हिडिओ आणि चर्चा विचार मते मतांतरे उघडपणे मांडले जात असल्याचे चित्र सध्या औसा तालुक्यामध्ये दिसून येत आहे. यामुळे हा औसा ते आलमला, लखनगाव, उटी, सत्तर्धरवाडी रस्ता होणे आवश्यक आहे.जेणेकरून भविष्यामध्ये या शेतकरी प्रवासी नागरिकांची खंबीर साथ नक्कीच विकासाला राहील अशी अपेक्षा अनेक शेतकरी नागरिक व्यक्त करीत आहेत..

पहा...डिजिटल इंडियाचे रस्ते... अनेकवेळा आमदार,त्यांचे खास कार्यकर्ते यांना बोलूनही रस्त्याचे काम झाले नाही म्हणून हा रस्ता प्रवासासाठी अत्यंत खराब असल्यामुळे आम्ही अनेक शेतकरी नागरिक प्रवासी औसा ते भादा रोड हळदुर्ग मार्गे उटी लखनगाव या मार्गाने गावाकडे जातो....पण आमदार साहेब या रस्त्याने येतं का?आमचे दैनंदिन हाल पाहता का? अशी म्हण्याची वेळ आली आहे..

-रामकृष्ण एस जाधव, माजी चेअरमन उटी (बु) ता औसा...

मलाबार गोल्ड अँड डायमंड्सचा लातूरमध्ये भव्य 'डायमंड शो'!

१९ ते २२ नोव्हेंबरदरम्यान हिऱ्यांच्या दागिन्यांचे प्रदर्शन शो : प्रमाणपत्रासह आकर्षक ऑफर्स

लातूर/संतोष सोनवणे

हिऱ्यांच्या दागिन्यांची आवड असणाऱ्या ग्राहकांसाठी लातूरमध्ये एक खास पर्वणी उपलब्ध होत आहे. जागतिक स्तरावर दागिन्यांच्या क्षेत्रात विश्वासार्ह ओळख निर्माण केलेल्या मलाबार गोल्ड अँड डायमंड्स यांच्या वतीने भव्य ' हिऱ्यांचा डायमंड शो २०२६' आयोजित करण्यात आला आहे. दि. १९ ते २२ नोव्हेंबर २०२६ या चार दिवसांच्या कालावधीत हा विशेष शो लातूर येथील मलाबार गोल्ड अँड डायमंड्सच्या शोरूममध्ये होणार आहे.

'सेलेब्रेट द स्परकले वीथीन अर्थात आपल्या अंतर्मनातील चमक साजरी करा, ही या डायमंड शोची संकल्पना आहे. या शोमध्ये ग्राहकांना उत्कृष्ट कलाकुसर, आकर्षक डिझाइन्स आणि खास निवड केलेल्या हिऱ्यांच्या दागिन्यांचे वैविध्यपूर्ण कलेक्शन पाहण्याची व खरेदी करण्याची संधी मिळणार आहे.

या डायमंड शोचे विशेष आकर्षण म्हणजे लग्नसराईसाठी खास ब्रायडल कलेक्शन, सॉलिटेअर डायमंड्स तसेच पुरुषांसाठी विशेष निवड केलेल्या डायमंड कलेक्शनची आकर्षक रेंज उपलब्ध असणार आहे. आधुनिक फॅशन, पारंपरिक कलाकुसर आणि सौंदर्यपूर्ण डिझाइन्स यांचा सुंदर संगम या दागिन्यांमध्ये अनुभवता येणार आहे.

ग्राहकांसाठी खास सुविधा आणि आकर्षक लाभ!

या विशेष डायमंड शोमध्ये ग्राहकांना प्रमाणपत्रासह हिऱ्यांचे दागिने, आजीवन मोफत देखभाल, १०० टक्के बाय-बॅक हमी तसेच एक वर्षाचा मोफत विमा अशा विशेष सुविधा देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. लग्नसमारंभ, साखरपुडा, वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस आणि आयुष्यातील विविध आनंदाचे क्षण संस्मरणीय बनवण्यासाठी आकर्षक हिऱ्यांचे दागिने निवडण्याची ही उत्तम संधी आहे. स्वतःसाठी किंवा आपल्या प्रिय व्यक्तींना खास भेट देण्यासाठीही या शोमधील दागिन्यांचे कलेक्शन ग्राहकांचे लक्ष वेधून घेणार आहे. मलाबार गोल्ड अँड डायमंड्स ही आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेली नामांकित ज्वेलरी कंपनी असून, कंपनीचे १४ देशांमध्ये ४५० हून अधिक शोरूम्स असल्याची माहिती देण्यात आली आहे. दर्जेदार दागिने, आकर्षक डिझाइन्स आणि ग्राहकांचा विश्वास ही कंपनीची वैशिष्ट्ये आहेत.

शोचा कालावधी व ठिकाण :
दिनांक : १९ ते २२ नोव्हेंबर २०२६
ठिकाण : मलाबार गोल्ड अँड डायमंड्स, डी-१/३९०९, टिळक नगर, सावे वाडी, एम.जी. रोड, लातूर.
संपर्क : ०२३८२-२४२९१६ / ०९५६२ ९१६ ९१६

हिऱ्यांच्या दागिन्यांचे आकर्षक विश्व जवळून अनुभवण्यासाठी आणि आपल्या आवडीच्या दागिन्यांची निवड करण्यासाठी लातूरकर ग्राहकांनी या चार दिवसीय भव्य डायमंड शोला आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन मलाबार गोल्ड अँड डायमंड्सच्या व्यवस्थापन व टीमच्या वतीने करण्यात आले आहे.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणुकीत

सहकार पॅनलचे सर्व पंधराही उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होणार-आ.अमित देशमुख

लातूर/प्रतिनिधी

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूरचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी रविवार, दि. १५ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणुकीतील सहकार पॅनलच्या लातूर तहसील येथील बुथला प्रत्यक्ष भेट दिली. यावेळी त्यांनी पदाधिकाऱ्यांकडून मतदानाची सविस्तर आकडेवारी जाणून घेतली आणि सहकाराच्या प्रगतीसाठी मतदार सहकार पॅनलच्या सर्व उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करतील, असा ठाम विश्वास व्यक्त केला.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी आज मतदान होत असताना, सकाळी मतदान केंद्राला भेट देऊन सहकारमहर्षी आदरणीय दिलीपराव देशमुख साहेब आणि सहकारमंत्री आदरणीय बाबासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक लढवत असलेल्या, तसेच माजी आमदार आणि विद्यमान अध्यक्ष धीरज देशमुख यांच्या नेतृत्वाखालील सहकार पॅनलच्या पेंडॉलला त्यांनी भेट दिली व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधला.



यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, लातूर जिल्ह्यात सहकाराची भक्कम पायाभरणी कोणी केली, सहकारी संस्थांची उभारणी करून त्या यशस्वीपणे कोण चालवत आहे आणि सहकाराच्या माध्यमातून जिल्ह्याच्या विकासाला कोणी गती दिली, याची पुरेपूर जाणीव जिल्ह्यातील सुजाण मतदारांना आहे. त्यामुळे विरोधकांच्या निरर्थक आरोपांपेक्षा कामाचा अनुभव, विश्वासार्ह नेतृत्व आणि सहकार क्षेत्रातील योगदानालाच मतदार प्राधान्य देतील. याच विश्वासाच्या बळावर सहकार पॅनलचे पंधराही उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त गोंड वस्तीत विविध स्टॉल प्रदर्शनासह रक्तदान शिबिर

लातूर/संतोष सोनवणे

आदिवासी समाजाचे महानायक, स्वातंत्र्यसेनानी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त रणरागिणी कलापथक व बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, लातूर यांच्या वतीने गोंड वस्ती, बाभळगाव येथे विविध स्टॉल प्रदर्शन आणि संजीवनी ब्लड बँकेच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून रक्तदान शिबिरात २१ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. आदिवासी समाजातील पारंपरिक ज्ञान, कला, कौशल्ये आणि स्थानिक उपजीविकेच्या साधनांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या स्टॉल प्रदर्शनात झाडपाला व आयुर्वेदिक औषधी, विविध मसाले, सुकामेवा, मध, कान साफ करण्यासाठी लागणारे साहित्य, आकर्षक सजावटीच्या वस्तू तसेच शेळीपालन आदी विषयांवरील स्टॉल मांडण्यात आले होते. या प्रदर्शनाच्या माध्यमातून आदिवासी समाजातील पारंपरिक ज्ञान आणि कौशल्यांना हक्काचे व्यासपीठ मिळण्याबरोबरच स्थानिक व्यवसाय व स्वयंरोजगाराच्या संधींना चालना देण्याचा स्तुत्य प्रयत्न करण्यात आला. रक्तदान शिबिराचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शहर संघचालक उमाकांतजी मद्रेवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भटके विमुक्त विकास परिषदेचे प्रांत सहसंयोजक सुधाकरजी कुलकर्णी, शहर संयोजक हरीश काळे आणि शहर सहसंयोजक श्री. दुर्गेश चव्हाण



यांची प्रमुख उपस्थिती होती. भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, स्वाभिमानासाठी आणि सामाजिक न्यायासाठी केलेला संघर्ष व त्यांचे योगदान आजही समाजाला प्रेरणा देणारे आहे. त्यांच्या जयंतीचे औचित्य साधून पारंपरिक वारशाचे जतन, स्थानिक कौशल्यांचे संवर्धन आणि रक्तदानासारख्या जीवनदायी उपक्रमातून मानवतेचा संदेश देण्याचा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. या संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रणरागिणी संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रकाश भोकरे आणि सचिव सौ. कांचन वाघमारे यांनी सुरुवातीपासून शेवटपर्यंत उपस्थित राहून नियोजन व व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळली. रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांचे, संजीवनी ब्लड बँकेचे जनसंपर्क अधिकारी डॉ. सितम सोनवणे आणि त्याची सर्वटीम कार्यक्रमाला उपस्थित राहून सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवरांचे संस्थेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

रंगकर्मी प्रतिष्ठानच्या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

उदगीर/पाटील मनेश

उदगीर येथील रंगकर्मी साहित्य, कला, क्रीडा प्रतिष्ठानच्या वतीने विविध क्षेत्रातील उत्कृष्ट व भरीव कार्य करणाऱ्या व्यक्तींना दिल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन रंगकर्मी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. बिभीषण मद्देवाड यांनी केली आहे .रंगकर्मी प्रतिष्ठानच्या वतीने सामाजिक ,शैक्षणिक ,कृषी, आरोग्य ,पर्यावरण ,कला व साहित्य क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना राज्यस्तरीय पुरस्काराने मागील ११ वर्षापासून मान्यवरांच्या हस्ते भव्य रपुरस्कार वितरण सोहळ्यात सन्मानित केले जाते . महात्मा बसवेश्वर समाजसेवा, छत्रपती शिवाजी महाराज पर्यावरण व कृषी, क्रांतीज्योती सावित्रीबाई ज्योतिराव फुलेराज्यस्तरीय आदर्श शिक्षक ,डॉ बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण ,जिवनगौरव , साहित्यरत्न अण्णा भाऊसाठे साहित्य गौरव या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे

रंगकर्मी साहित्य कला क्रीडा प्रतिष्ठानच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील लघुपट महोत्सव आरोग्य शिबिर ,पत्रकारिता पुरस्कार , साहित्य संमेलन, पथनाट्यातून विविध विषयावर जनजागृती, महापुरुषांच्या विचारावर आधारीत वक्तृत्व स्पर्धा ,शालेय विद्यार्थ्यांसाठी विज्ञान प्रदर्शन व राज्यस्तरीय क्रीडा , चित्रकला ,निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन केले जाते . रंगकर्मीच्या वतीने राजमाता जिजाऊ - ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले लाडकी लेक या योजनेतंर्गत मुलीच्या व आईच्या नावे५०००₹ फिक्स करुन मुलीच्या जन्माचे स्वागत करण्यासाठी जळकोट तालुक्यातील विराळ गाव दत्तक घेतले आहे.

पुरस्कार्थीना मानपत्र ,गौरव चिन्ह शॉल , असे रंगकर्मीच्या वतीने दिल्या जाणाऱ्या पुरस्काराचे स्वरूप असून सामाजिक शैक्षणिक साहित्य कला आरोग्य पर्यावरण क्षेत्रातील उत्कृष्ट व भरीव कार्य करणाऱ्या व्यक्ती संस्थानी २०२७ च्या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी दिनांक २५ डिसेंबर २०२६ पर्यंत पोहोचतील या पद्धतीने प्रस्ताव पाठवावे पुरस्कार वितरण जानेवारी शेवटच्या आठवड्यात होणार असून त्यासाठी प्रस्ताव प्रा बिभीषण मद्देवाड लोकाक्षर कार्यालय ग्रामीण पोलीस स्टेशन समोर उदगीर जिल्हा लातूर४१३५१७ मोबाईल नंबर ९८२३१६०५५२ या पत्त्यावर पाठविण्याचे आवाहन रंगकर्मीचे अध्यक्ष प्रा. बिभीषण मद्देवाड सचिव प्रा ज्योती मद्देवाड, सिद्धार्थ सूर्यवंशी मारुती भोसले अँड महेश मळगे महादेव खळूरे, रसूल पठाण रामदास केदार लक्ष्मण बेंबडे, सचिन शिवशेट्टे मुख्याध्यापक दादाराव दाडगे, विवेक होळसंबरे, प्रल्हाद येवरीकर जहाँगीर पटेल, नीता मोरे ज्ञानेश्वर बडगे टी डी. पांचाळ बालाजी भोसले अर्चना पाटील मोहसिन शेख नारायण कुंडले मारुती वाघमारे ,गजानन देवकत्ते,हणमंत केंद्रे नागनाथ गुट्टे ,मनोहर लोहारे , संदीप निडवदे ,विशाल आदेप्पा ,श्रीधर जाधव, श्रीधर सावळे आदींनी केले आहे.

भारतीय चिंतन आणि परंपरेचा प्रकाश जगभर पसरणार; रामेश्वर येथील 'विश्वधर्मी मानवतातीर्थ' भवनातील पत्रकार परिषदेत प्रा.डॉ.वि.दा.कराड

लातूर/संतोष सोनवणे

जगाला शांतीची, मानवतेची आणि कल्याणाची दिशा दाखवणारे केंद्र म्हणजे विश्वधर्मी मानवता तीर्थ भवन ठरेल. या मानवतातीर्थ भवनातून भारतीय चिंतन आणि परंपरेचा संदेश संपूर्ण विश्वात पोहोचणार, असा विश्वास विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी व्यक्त केला.

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत आणि मानवता तीर्थ रामेश्वर (रुई) यांच्या संयुक्त विद्यमाने जगातील सर्वात मोठ्या आणि विस्तीर्ण दालन असलेल्या लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर येथील 'विश्वधर्मी मानवतातीर्थ भवन' येथे आयोजित पत्रकार परिषदेत प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड बोलत होते.

यावेळी विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, ''मानवता भवनमध्ये सत्य, शांती, अहिंसा, प्रेम आणि मानवतेचे मूर्तिमंत प्रतीक असलेल्या मानवी इतिहासातील उत्तुंग व पथदर्शी व्यक्तिमत्त्वांची चैतन्यदायी प्रतीके आहेत. भगवान गौतम बुद्धांचे



पंचशील आणि संत ज्ञानेश्वर माऊलींचे पसायदान हे मानवोद्धारासाठी आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील भारताचे खरे रूप रामेश्वर येथे साकार होताना दिसत आहे.''

''विश्वात सुरू झालेल्या संघर्षाच्या वातावरणात मानव भयभीत झाला आहे. अशा वेळेस मानवधर्मा संदर्भात विचार करतांना एकात्मता, विज्ञान आणि अध्यात्माचा सारांश या सर्वांचा मेळ म्हणजेच मानवता. सर्व धर्मांचा गाभा हा मानवतेचा आहे. येथूनच सात्विकतेचा आणि अहिंसेचा विचार विश्वाला तारणारा आहे. या वास्तूत मानवधर्माचे तीर्थ क्षेत्र दिसून येत आहे. असेही डॉ. विश्वनाथ कराड यांनी सांगितले.''

प्रा. ज्योती कराड ढाकणे म्हणाल्या, ''जगाला एका सूत्रात बांधून ठेवायचे असेल तर मानवताच एकमेव आधार आहे. मानवतेशिवाय कोणताही देश जिवंत राहू शकत नाही. देशाच्या उन्नतीसाठी मानवता आणि व्यक्तीचे शुद्ध आचरण अत्यंत महत्त्वाचे आहे. आज रामेश्वर (रुई) येथे विश्वनाथांच्या रूपाने मानवतेची ज्योत पेटविण्यात आली आहे, जी संपूर्ण जगाच्या कल्याणासाठी आहे.''

''मानवता तीर्थ ही फक्त वास्तू नाही तर एक संदेश आहे. जग पुन्हा तिसऱ्या महायुद्धाच्या मोठ्या विनाशाच्या दिशेने जात आहे. अशा वेळेस या भावनातून दिला जाणारा संदेश मानव जातीला तारू शकतो.'' असेही प्रा. ज्योती कराड ढाकणे यांनी बोलून दाखविले. शेवटी डॉ. हनुमंत कराड यांनी उपस्थित पत्रकारांचे आभार व्यक्त केले.

यावेळी पत्रकार परिषदेत माईर्स एमआयटीचे विश्वस्त ह.भ.प. तुळशीराम दा. कराड, प्रगतशील शेतकरी ह.भ.प. काशीराम दा. कराड आणि बालासाहेब कराड उपस्थित होते.

छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात भगवान बिरसा मुंडा यांची जयंती साजरी



उदगीर/पाटील मनेश

छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात भगवान बिरसा मुंडा यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी संस्थेचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील यांच्या हस्ते भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी संस्थेचे सचिव पी.टी शिंदे, प्राचार्य डॉ. रामकिशन मांजरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्राचार्य डॉ. रामकिशन मांजरे आपल्या मनोगतातून भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्याचा गौरव करताना म्हणाले, भगवान बिरसा मुंडा हे आदिवासी समाजातील स्वातंत्र्यलढयात इंग्रजा विरोधातील चळवळीमध्ये सहभागी झाले. आदिवासींचे होणारे शोषण तसेच जमिनीची लूट याविरुद्ध त्यांनी बंड पुकारले .भगवान बिरसा मुंडा यांनी बिरसैत पक्षाची स्थापना केली. ज्यामध्ये निसर्गपूजा, व्यसनमुक्ती व सामाजिक एकतेचा समावेश होतो. ते वयाच्या केवळ पंचविसाव्या वर्षी रांचीच्या तुरुंगात मृत्युमुखी पडले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक सहसंयोजक प्रा.डॉ. ज्ञानोबा मुळे यांनी केले. या कार्यक्रमास प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपास्थित होते. हा कार्यक्रम जयंती समितीच्या वतीने घेण्यात आला.

16 Nov 2026 Nanded page 5_Layout 1 11/15/2026 11:50 PM Page 1

महाराष्ट्रातील निर्भिड दैनिक

जगभित्र

मकसूद पटेल (जिल्हा प्रतिनिधी) शेख मौला शेख उस्मान (उपसंपादक नांदेड जिल्हा आवृत्ती)

मो.9767785855, 9422797473 मो.9766664949 PRGI.No.- MHMAR/26/A0270

नांदेड जिल्हा आवृत्ती — सोमवार दि.१६ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ५

आखाडा बाळापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने भगवान बिरसा मुंडा जयंती उत्साहात साजरी

कळमनुरी/गंगासागर पंडित

कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने संतोष बर्गे हार्डवेअर दुकान येथे भगवान बिरसा मुंडा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते दिलीपराव चव्हाण, माजी जिल्हाध्यक्ष बी. डी. बांगर, हिंगोली जिल्हा सरचिटणीस बाबुरावजी वानखेडे, पत्रकार विनायक हेंद्रे पाटील, राष्ट्रवादी जिल्हा उपाध्यक्ष वसंतराव पतंगे, अरुण मेड, प्रदेश उपाध्यक्ष संतोष आमले, कैलास खिल्लारे, अजमत फारूखी ॲड.



तुषार पवार, शेख अबजल, संतोष बर्गे, शहराध्यक्ष श्याम खाडे, महिला शहराध्यक्ष माधुरीताई पातूरकर, संभाजी कुंभकर्ण, किशन डोके, देविदास बोंढारे, चम्पतराव डाके, आकाश टार्फे, दत्ता धनवे, गजानन पिंपरे, रमेश मरकळ, संदीप मरकळ, संतोष धनवे, गोपाल फोफसे, दत्ता मरकळ यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुदखेड पोलिसांची अवैध रेती वाहतुकीवर धडक कारवाई; ४८.३५ लाखांचा मुद्देमाल जप्त, चौघांवर गुन्हे दाखल!

पोलिसांच्या कारवाईनंतरही रात्रीची रेती वाहतूक सुरूच; महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह!

मुदखेड/प्रतिनिधी

नांदेड जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीला आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या आदेशानुसार विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत मुदखेड पोलिसांनी दोन स्वतंत्र कारवाया करत तब्बल ४८ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, चार जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.

पहिल्या कार्यवाहीत मुगट पाटी रोडवर करण्यात आली. यावेळी विनापरवाना दोन ब्रास रेतीची वाहतूक करणारा टिपर (एमएच २६ एडी २३१५) पकडून ८ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी विठ्ठल भुंजराव बोधरे (रा. पाथ्रड) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

दुसऱ्या कार्यवाहीत महाटी-माळकोठा मार्गावर करण्यात आली. येथे पाच ब्रास अवैध रेती वाहतूक करणारे वाहन (एमएच २६ एडी १९१८) पकडण्यात आले. या कारवाईत ४० लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून संभाजी एकनाथ पवार (रा. आमदरा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.



दरम्यान, पोलिसांकडून धडक कारवाया सुरू असतानाही मुदखेड शहर व परिसरात रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात अवैध रेती वाहतूक सुरूच असल्याचे चित्र आहे. अवैध उत्खनन व वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी असलेल्या महसूल प्रशासनाकडून मात्र अपेक्षित कारवाई होत नसल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे. महसूल विभाग नेमका गप्प का? असा सवाल उपस्थित होत असून, पोलीस व महसूल प्रशासनाने संयुक्तपणे कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक संदीप जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गणेश कराड, पोलीस उपनिरीक्षक रमेश पुणेबोईनवाड, सुरेश जाधव व पोलीस अंमलदार चक्रधर, शिंदे आणि सुकनवार यांच्या पथकाने केली.

काँग्रेस कार्यकर्ते गिरीश कोत्तावार यांच्या निवासस्थानी 'पान-सुपारी' कार्यक्रम संपन्न

राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

मुदखेड/प्रतिनिधी

काँग्रेस पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते गिरीश कोत्तावार यांच्या निवासस्थानी नुकताच स्नेहमेळाव्याचे औचित्य साधून 'पान-सुपारी' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, आप्तेष्ट, मित्रपरिवार तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने उपस्थितांनी एकमेकांशी संवाद साधत शुभेच्छांची देव-ाणघेवाण केली. तसेच विविध सामाजिक व राजकीय विषयांवर अनौपचारिक चर्चा झाली. खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे कोत्तावार यांच्या निवासस्थानी उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. कोत्त-ावार कुटुंबीयांनी उपस्थितांचे स्वागत करून आभार मानले.

कार्यक्रमाला यांची उपस्थिती :



यावेळी माजी उपाध्यक्ष करीमखाँ साहेब, नगरपरिषद गटनेते प्रतिनिधी मुजीब पठाण, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष दिनेश शर्मा, काँग्रेस सेवादल तालुकाध्यक्ष गंगाधर मगरे पाटील, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक किशोर पाटील, पत्रकार अतिक अहमद, पत्रकार धम्मादत्ता कांबळे, पत्रकार सिद्धार्थ चौदंते, पत्रकार संतोष दर्शनवाड, विश्वनाथ पवार निवघेकर, रमेश बोडके,सुभाष चौदंते शिवानंद देवके, अनिस नायगावकर, गजानन पांचाळ, वेदांत शेवटे, खदीर कुरेशी, बालाजी सूर्यवंशी, ज्येष्ठ नागरिक भीमाप्पा कोत्तावार, ऋषिकेश कोत्तावार, पोलीस हेड कॉन्स्टेबल भिस्से साहेब, सुभाष चौदंते, गौस भाई फुलवाले, माणिका मुंगल, आकाश आरेवाड, रोहन आगलावे आदी मान्यवर उप-स्थित होते

बर्की चौक ते मन्यार गल्ली, हबिब टाकीज रोडवर-हातगाड्यांचे दोन्ही बाजूने रस्त्यावर अतिक्रमणाचे साम्राज्य, मनपा अधिकारी मूग गिळून गप्प?

नांदेड/शेख मौला

नांदेड शहरातील सर्वात गजबजलेला बर्की चौक ते मन्यार गल्ली हा मुख्य रस्ता गुरुत्व-ागतीच्या काळात शंभर फुटाचा करण्यात आला होता पण या रस्त्यावरून सध्या सध्या हातगाडीवाल्यांच्या अतिक्रमणाच्या विळख्यात पूर्णपणे अडकला आहे. रस्त्याच्या दुतर्फा दोन्ही बाजूने ३०-३० फुटापर्यंत हातगाड्यांनी अतिक्रमण करून आपला व्यवसाय थाटल्यामुळे मूळचा १०० फुटाचा रस्ता आता ४० फुटावर आला आहे. त्यामुळे नागरिकांना चालण्यासाठी ना फूटपात आहे ना रस्ता पण नागरिकांना पायाने चालत असताना रस्ताच शोधावा लागत आहे.

या भागातील अनेक व्यापाऱ्यांच्या दुकानासमोरच हातगाडीवाले ठाण मांडून बसत असल्याने व्यापारी वर्ग प्रचंड संकटात सापडला आहे. दुकानासमोरच गाडे लागल्याने ग्राहक दुकानात येत नाही, दुकानाची दर्शनी भाग झाकला जातो. यावरून रोज व्यापारी आणि हातगाडीवाले यांच्यात शिवीगाळ, वादविवाद होत आहेत. कधी भांडण हाणामारीपर्यंत जाते. अशी परिस्थिती पाहून अनेक वेळा विक्रम



पाटील बामणीकर शिवसेना उपशहर प्रमुख नांदेड दक्षिण यांनी निवेदन देऊनही या रस्त्यावरील अतिक्रमण हातगाडे हटवले जात नाहीत सर्वात गंभीर बाब म्हणजे या अतिक्रमणाबाबत नगरपालिका आयुक्तांना अनेक वेळा लेखी निवेदने देऊनही महापालिकेला अतिक्रमण हटवण्यात पूर्ण अपयश आले आहे. महापालिकेचे अतिक्रमण पथक केवळ नावाप-ुरतेच उरले आहे का? असा संतप्त सवाल व्यापारी वर्गातून विचारला जात आहे.

व्यापाऱ्यांच्या व्यथा

आम्ही लाखो रुपये भाडे भरतो, परवाना भरतो, जीएसटी भरतो आणि हे हातगाडीवाले फुकटात आमच्या दुकानासमोर धंदा करतात. ग्राहकाला वाटते की रस्ताच बंद आहे. आमचा धंदा निम्म्यावर आला आहे, असे एका व्यापाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

पादचाऱ्यांचे हाल

शाळकरी मुले, महिला, वयोवृद्ध नागरिकांना या रस्त्यावरून चालणे म्हणजे जीव धोक्यात घालण्यासारखे आहे. रस्त्यावर हातगाड्या, त्यामुळे मुख्य रस्त्यावरून वाहने चालवणे म्हणजे जीव मोठे घेऊन चालवणे होय थोडे हातगाड्याला लागल्यास त्या ठिकाणी २० ते २५ जण व्यापारी गोळा होऊन त्या गाडीवाल्यांना मारत असतात अशा घटना अनेक वेळा घडल्या आहेत पण पादचाऱ्यांना रस्त्यावरून पायी चालणे देखील कटिंग झाले आहे हे म्हणणं पाटील अधिकारी यांना दिसत नाही का असा संतप्त संवाद पादचारी व्यक्ती बोलून दाखवत आहे.

समाजहितासाठी वैचारिक मतभेद बाजूला ठेवून एकत्र येणे आवश्यक-लक्ष्मणराव ठक्करवाड

कुंडलवाडीत भगवान बिरसा मुंडा पुतळा उभारणी भूमिपूजन उत्साहात संपन्न

कुंडलवाडी/प्रतिनिधी

नगर परिषद निवडणुकीत आपण जरी एकमेकांच्या विरोधात होतो, तरी समाजहित लक्षात घेऊन आपण सर्वांनी एकत्र येणे आवश्यक आहे. समाजासाठी काम करीत असताना राजकीय, न्यायालयीन लढाई जिंकण्यासाठी एकत्र येऊन काम करावे लागेल. समाजहितासाठी वैचारिक मतभेद बाजूला ठेवून समाजहित साध्य करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन मन्नेरवारलू समाज संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष लक्ष्मणराव ठक्करवाड यांनी केले.ते कुंडलवाडी येथे भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त पुतळा भूमिपूजन कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई कोटलावार होत्या. उद्घाटक म्हणून मन्नेरवारलू समाज संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष लक्ष्मणराव ठक्करवाड तर प्रमुख पाहुणे म्हणून सपोनी गणेश कराड,सपोउपनि गजेंद्र मांजरमकर,माजी नगराध्यक्ष भुमन्ना ठक्करवाड, वैद्यकीय अधिकारी डॉ.सारिका अनमुलवाड, जेष्ठ नगरसेवक राजेश्वर उत्त-ारवार, मन्नेरवारलू समाज संघटनेचे तालुका अध्यक्ष साईरेड्डी ठक्करवाड, सोसायटी चेअरमन साईनाथ उत्तरवार,शिवाजी पोरडवाड,राजेंद्र तोटावाड, शिवराम कोटलावार, आनंद पाटील, गंगाधर पोरडवार,उमाकांत



समाजहितासाठी एकत्र या - लक्ष्मणराव ठक्करवाड | कुंडलवाडी प्रतिनिधी - मोहम्मद अफझल पत्रकार

गोपछडे,पानसरे पेंटावार, दत्तात्रय नरावाड, गंगाधर मलकूवार, तिरुपती गट्टूवार, बाबाराव भाले, नागनाथ तुमोड, गंगाधर पुप्पलवार, मारोती जायेवार, पंढरी पुप्पलवार, हणमंतू ईरलावार आदी उपस्थित होते. पुढे बोलताना ठक्करवाड म्हणाले, नांदेडमध्ये समाजातील लोक विविध संघटनेत काम करतात, पण एकत्र येऊन जयंती साजरी केली. राजकारणात विविध पक्ष आहेत. समाजात सुद्धा विविध संघटना आहेत. पण सर्वांचा हेतू समाजाचे हित करणे हाच आहे. समाजाचे हित करीत असताना जरी आपले वैचारिक मतभेद असले, तरी मनभेद राहता कामा नये. समाजासमोर अनेक प्रश्न आहेत. ते सोडविण्यासाठी आपणास एकत्र काम करावे लागेल. समाजाची एक मोठी ताकद संघटनेच्या मागे उभी करावी लागेल. ज्या वेळेस समाजाची ताकद संघटनेच्या मागे असते, तेव्हा समाजाचे प्रश्न नक्कीच सोडविता येऊ शकतात. कुंडलवाडीत मोठ्या प्रमाणात आदिवासी समाजबांधव आहे. सर्वांनी एकत्र येऊन काम करावे, समाजहित साधावे. के.रामलू साहेबांची नात-सून नगर परिषदेत नगराध्यक्ष म्हणून विराजमान आहे. त्यांनी भगवान बिरसा मुंडा यांचे भव्य स्मारक उभे करण्याचा आज जो भूमिपूजनाचा कार्यक्रम घेतला, त्याबद्दल त्यांचे व त्यांच्या सर्व नगरसेवकांचे ठक्करवाड यांनी यावेळी आभार मानले. यावेळी नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई कोटलावार, नगरसेवक राजेश्वर उत्तरवार, अमरनाथ कांबळे यांनी आपापले विचार मांडले. समाजबांधवांतर्फे मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. उद्घाटक लक्ष्मणराव ठक्करवाड यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत भगवान बिरसा मुंडा यांच्या पुतळा उभारणीचे भूमिपूजन पार पडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मन्नेरवारलू समाज तालुका अध्यक्ष साईरेड्डी ठक्करवाड यांनी केले,तर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ.नरेश बोधनकर आभार नगरसेवक डॉ. प्रशांत सब्बनवार यांनी मानले. कार्यक्रमास सर्व नगरसेवक, शहरातील मोठ्या प्रमाणात मन्नेरवारलू समाजबांधव उप-स्थित होते.

कु.अक्षिता नरावाड यांची एमबीबीएस शिक्षणासाठी निवड

कुंडलवाडी/प्रतिनिधी



बिलोली तालुक्यातील कुंडलवाडी येथील एका शेतकरी कुंटूबातील होतकरू तरुणी कु.अक्षिता सयाराम नर-ावाड हिने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर मोठे यश संपादन केले आहे. तिची आदर्श ईन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स,वाडा,पालघर येथे एम.बी.बी.एस. शिक्षणासाठी निवड झाली आहे.

कु.अक्षिता नुकत्याच झालेल्या निट परीक्षेत घवघवीत यश मिळवले असून तिच्या या यशाबद्दल कुंडलवाडी नगर परिषद नगराध्यक्षा सौ.प्रेरणाताई कोटलावार त्याचे प्रतिनिधी गजानन कोटलावार, सर्व नगरसेवक, नगरसेविका, सोसायटीचे चेअरमन सुनील बेजगमवार, व्हा.चेअरमन गंगाधर नरावाड आदींसह मित्र परिवार, शिक्षकवृंद सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

यावेळी बोलताना कु.अक्षिता नरावाड म्हणाली, माझा वडिलांचे स्वप्न होते,आणि माझी इच्छा होती की,आमच्या परिव-ारातून मी डॉक्टर व्हावे. यासाठी मी प्रयत्न केले आणि मला यश मिळाले.

''माझ्या यशामध्ये आई-वडील आणि काका आणि आमच्या परिवारातील सर्वांचे मोलाचे मार्गदर्शन व मोठे योगदान आहे.या सर्वांनी दिलेल्या पाठिंब्यामुळेच मला हे यश संपादन करता आले. भविष्यात डॉक्टर होऊन ग्रामीण भागातील रुग्णांची सेवा करणे हे माझे ध्येय आहे.''

स्वावलंबनातून आर्थिक विकास हे पंडित जवाहरलाल नेहरूंचे व्यापक ध्येय-प्राचार्य डॉ.विजय कुलकर्णी



देगलूर/अजीम अन्सारी

नवस्वातंत्र्य प्राप्त भारताच्या आर्थिक विकासासाठी स्वावलंबन अत्यावश्यक असून सर्वांगीण क्षेत्रातील स्वावलंबनातून देशाचा आर्थिक विकास घडवून आणणे हे नेहरूंचे उदात्त ध्येय होते,असे मत प्राचार्य डॉ.विजय कुलकर्णी यांनी व्यक्त केले.वैकुंठवासी धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने १४ नोव्हेंबर २०२६ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय समारोप प्रसंगी ते बोलत होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ.दिगंबर कुलकर्णी, डॉ.भास्कर कोशीडगेवार, प्रा. अनिल ठोसरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात प्रथम पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.पुढे बोलताना प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी म्हणाले की, १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झाले त्यावेळी प्रचंड दारिद्र्य होते,देशाला स्वावलंबी बनवणे ही तत्कालीन गरज लक्षात घेऊन पंडित जवाहरलाल नेहरूंनी नियोजन मंडळाच्या माध्यमातून पंचवार्षिक योजना यशस्वीरित्या कार्यान्वित केल्या.कार्यक्रमाचे नियोजन डॉ.भास्कर कोशीडगेवार व डॉ.दिगंबर कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.ए. द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी कंदुलवार विद्या यांनी केले तर आभार बी.ए.तृतीय वर्षातील विद्यार्थिनी कंदुलवार वर्षा यांनी मानले.

वात्सल्य नगर सोसायटीमध्ये सिमेंट काँक्रीटच्या ३० लक्ष रूपयांचा रस्त्याचे भुमि पूजन



नांदेड/प्रतिनिधी

नांदेड वाघाळा शहर महान-गरपालिका सिडको परिसरातील प्रभाग क्रमांक २० मधील भाजपचे नगरसेवक संजय पाटील घोगरे यांच्या पुढाकाराने वात्सल्य नगर सोसायटी मधील ९ मिटर सिमेंट काँक्रीटच्या प्रदिप दाचावार निवास ते कानगुले यांच्या निवासस्थानी पर्यंत ३० लाख रुपये निधी अंतर्गत कामाच्या शुभारंभ १५ नोव्हेंबर रोजी करण्यात आले.

कुंडलवाडी येथील चूंगीनाका चौकातील अंधाराचे साम्राज्य संपुष्टात

नगराध्यक्षा सौ.प्रेरणाताई कोटलावार व नगरसेवक मारोती कोटलावार यांचे आभार

कुंडलवाडी/मोहम्मद अफजल

कुंडलवाडी शहराचे प्रवेशद्वार असलेल्या चुंगीनाका चौकातील गेल्या अनेक वर्षांपासूनचे अंधाराचे साम्राज्य अखेर संपुष्टात आले आहे.



नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई कोटलावार यांच्या सहकार्यातून व प्रभाग क्रमांक १० चे नगरसेवक मारोती कोटलावार यांच्या विशेष प्रयत्नांतून चुंगीनाका चौकात विद्युत खांब बसवून दोन हायमॅक्स बल्ब लावण्यात आले. त्यामुळे संपूर्ण चौक प्रकाशाने उजळून निघाला आहे. शहराच्या प्रवेशद्व-ारावरील हा अत्यंत महत्त्वाचा चौक गेल्या कित्येक वर्षांपासून अंधारात होता. रात्रीच्या वेळी नागरिकांना, प्रवाशांना व वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. याबाबत शहरातील विकासप्रेमी नागरिकांनी नगर परिषद प्रशासनाकडे लेखी निवेदन देऊन चुंगीनाका चौकात विद्युत रोषणाई करण्याची मागणी केली होती. नागरिकांच्या या मागणीची दखल घेत नगरसेवक मारोती कोटलावार यांनी विद्युत खांब उपलब्ध करून घेतले व स्वखर्चातून खांब बसवून हायमॅक्स दिवे बसविले. चुंगीनाका चौक प्रकाशमान झाल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. शहरातील विकासप्रेमी नागरिक नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई कोटलावार व नगरसेवक मारोती कोटलावार यांचे अभिनंदन,कौतुक करीत आभार व्यक्त करीत आहेत.

16 Nov 2026_Layout 1 11/15/2026 10:17 PM Page 2

तलवाड्यातील छत्रपती शिवाजी महाराज चौकासह हाद्दितील अवैध धंदे आणि मद्यपींचा बंदोबस्त करा

स्वाभिमानी शेतकरी संघटना व शिवस्मारक समितीचा तीव्र आंदोलनाचा इशारा, पोलीस अधीक्षक, तहसीलदार व तलवाडा पोलिसांना निवेदने सादर; महापुरुषांच्या पुतळ्याजवळील बंद सीसीटीव्ही सुरू करण्याची मागणी

तलवाडा/प्रतिनिधी

तलवाडा (ता. गेवराई) परिसरात अवैध धंदे आणि मद्यपींच्या सुळसुळाटामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या प्रकारांना आळा घालण्यासाठी १२ नोव्हेंबर रोजी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने पोलीस अधीक्षक (बीड), तहसीलदार (गेवराई) व तलवाडा पोलिसांना निवेदन दिले. त्यापाठोपाठ १४ नोव्हेंबर रोजी शिवस्मारक समिती व समस्त शिवभक्तांनी तलवाडा पोलीस निरीक्षकांना निवेदन देऊन छत्रपती शिवाजी महाराज चौकात धिंगाणा घालणाऱ्या मद्यपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या दोन्ही निवेदनांद्वारे प्रशासनाला तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीत सध्या बेकायदेशीर वाळू उपसा, मटका, जुगार क्लब, गुटखा आणि ढाब्यांवर अवैध दारू विक्री राजरोसपणे सुरू आहे. तसेच, रात्रीच्या वेळी चौकाचौकात तरुणांची टोळकी उभी राहून दहशत निर्माण करत आहेत. याविरोधात स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने दि. १२ नोव्हेंबर रोजी बीडचे पोलीस अधीक्षक, गेवराई तहसील कार्यालय व तलवाडा पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले. विशेष पथकाद्वारे हे सर्व अवैध धंदे तात्काळ बंद करावेत आणि गावातील तीन महापुरुषांच्या पुतळ्याजवळील बंद असलेले सीसीटीव्ही कॅमेरे त्वरित सुरू करावेत, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

या निवेदनावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष दिनकर रिंगणे, उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनुद्दीन, तालुकाध्यक्ष सुनीता गिल, बाळासाहेब शेंडगे, जयदेव शिंगणे व बाळू डहाळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. दरम्यान, समस्त शिवभक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या तलवाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकाचे पावित्र्य रात्रीच्या वेळी मद्यपींकडून धोक्यात आणले जात आहे. स्मारकासमोरच दारू पिऊन गोंधळ घालणे, शिवीगाळ आणि भांडणे करण्याचे प्रकार वाढले आहेत. यामुळे गावातील शांतता भंग होत असून शिवभक्तांच्या भावना दुखावल्या जात आहेत. या विरोधात शिवस्मारक समिती व समस्त शिवभक्तांच्या वतीने दि. १४ नोव्हेंबर रोजी तलवाडा पोलीस निरीक्षकांना निवेदन देऊन रात्रीची गस्त (पेट्रोलिंग) वाढवण्याची आणि मद्यपींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर अनिकेत नाटकर, गोपाल शिंदे, बळीराम माने, विलास लव्हाळे, विजय मरकड, किरण मरकड, राम चौधरी, सिद्धू काळे, विशाल शिंदे यांच्यासह समस्त शिवभक्तांच्या स्वाक्षऱ्या आहेत. प्रशासनाने या दोन्ही निवेदनांची तातडीने दखल न घेतल्यास समस्त नागरिकांना सोबत घेऊन तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. आता पोलीस प्रशासन या प्रकरणी काय कारवाई करणार याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

खाकीच्या कर्तव्याला दिवाळीच्या आनंदाची साथ!

विश्वास नांगरे पाटील यांच्याकडून पोलीस अधिकारी व अंमलदारांना सणानिमित्त भेटवस्तूंची अनोखी भेट!

मुंबई/नीलम चकोले

दिवाळीचा सण म्हणजे आनंद, उत्साह, आपुलकी आणि माणुसकीचा उत्सव. सर्वत्र दिव्यांची रोषणाई आणि आनंदाचे वातावरण असताना समाजाच्या सुरक्षिततेसाठी अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस बांधवांच्या चेहऱ्यावरही दिवाळीचा आनंद फुलविण्याचा स्तुत्य उपक्रम मा. विश्वास नांगरे पाटील यांनी राबविला. यावेळी त्यांनी पोलीस अधिकारी व अंमलदारांसोबत दिवाळीचा आनंद साजरा केला. तसेच खाकी वर्दीसाठी आवश्यक कपडे, मिठाई आणि विविध भेटवस्तू देऊन पोलीस बांधवांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. सण-उत्सवाच्या काळात नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस कर्मचारी अनेकदा आपल्या कुटुंबापासून दूर राहून कर्तव्य बजावत असतात. त्यांच्या या सेवाभावाची दखल घेत त्यांच्याप्रती सन्मान, कृतज्ञता आणि आपुलकी व्यक्त करणारा हा उपक्रम



उपस्थितांसाठी आनंददायी ठरला. कर्तव्याला सन्मान, खाकीला अभिमान आणि नात्यांना आपुलकीची ऊब देणारा हा दिवाळीचा सोहळा पोलीस बांधवांसाठी निश्चितच आनंददायी ठरला. सण आनंदाचा, नातं आपुलकीचं आणि अभिमान खाकीचा!

परळी तालुक्यातील ५० हजार ६८५ शेतकऱ्यांची दिवाळी मदतीविना; पाच हजारांच्या अग्रीमपासून वंचित!

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही दोन लाखांपर्यंत कर्जमाफी द्या; उत्तमराव माने यांची मागणी

परळी वैजनाथ/प्रतिनिधी



खरीप हंगामातील दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी तातडीचा आर्थिक दिलासा मिळावा, यासाठी राज्य सरकारने ३०४ दुष्काळी तालुक्यांतील पात्र शेतकऱ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत जाहीर केली होती. मात्र, परळी तालुक्यातील तब्बल ५० हजार ६८५ शेतकरी या मदतीपासून वंचित राहिल्याने शेतकऱ्यांची दिवाळी मदतीविनाच गेली आहे. शासनाने जाहीर केलेली मदत सर्व पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात प्रशासनाला अपयश आल्याची टीका शेतकरी नेते उत्तमराव माने यांनी केली आहे.

परळी वैजनाथ तालुक्यात एकूण ९७ हजार ८७६ शेतकरी असून, त्यापैकी ४७ हजार १९१ शेतकऱ्यांच्या बँक खात्यांवर २३ कोटी ५९ लाख ५५ हजार रुपयांची रक्कम जमा करण्यात आली आहे. मात्र, उर्वरित ५० हजार ६८५ शेतकऱ्यांना अद्याप या मदतीचा लाभ मिळालेला नाही. तालुक्यातील निम्म्याहून अधिक शेतकरी पाच हजार रुपयांच्या अग्रीम मदतीपासून वंचित राहिल्याने शासनाच्या मदत वितरण प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

'शेतकऱ्यांची दिवाळी काळी होऊ देणार नाही,' असे ठामपणे सांगणारे सत्ताधारी आता या वंचित शेतकऱ्यांच्या प्रश्नावर गप्प का आहेत? दिवाळीपूर्वी मदत देण्याची घोषणा करूनही हजारो शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा झाली नाही. शेतकऱ्यांना आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष आर्थिक मदतीची गरज आहे. तांत्रिक अडचणींचे कारण पुढे करून शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित ठेवणे योग्य नाही. शासनाने तातडीने सर्व पात्र शेतकऱ्यांच्या खात्यांवर मदत जमा करावी, अशी मागणी उत्तमराव माने यांनी केली.

शेतकरी ओळख क्रमांकाची नोंदणी, संयुक्त खातेदारांचे संमतीपत्र, आधार क्रमांक व बँक खाते जोडणी, डीबीटी प्रक्रियेतील तांत्रिक अडचणी तसेच अन्य प्रशासकीय त्रुटींमुळे काही शेतकऱ्यांची मदत रखडल्याचे सांगण्यात येत (पान २ वर)

छत्रपती संभाजी महाराज चौकात खड्डे, घाणीचे व दुर्गंधीचे साम्राज्य; व्यवसायिक व नागरिक त्रस्त

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

छत्रपती संभाजी महाराज चौक परिसरात खड्डे,घाणीचे व दुर्गंधीचे साम्राज्य निर्माण झाले असून, प्रशासनाने या पूर्वी देण्यात आलेल्या सर्व वर्तमानपात्रा तील बातम्याची तात्काळ दखल घेऊन तात्पुरती उपाययोजना केली होती. मात्र आता तोच प्रश्न पुन्हा आयरनिवर आला असून नालीच्या घाण पाण्याचा व खड्याचा प्रश्न कायम स्वरूपी मार्गी लावावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते बालाजी चाटे यांनी केली आहे. या समस्येमुळे हॉटेल, पानपट्टी, ऑटोमोबाईल, किराणा व्यवसायिक,विद्यार्थी, नागरिक तसेच परळीत बाहेरून येणाऱ्या भाविकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

शहरातील उड्डाणपुलाच्या बाजूने इराणी वस्ती पासून व शिवाजीनगर भागातून येणारे नालीचे पाणी थेट छत्रपती संभाजी महाराज चौक परिसरात येत



आहे. हे पाणी रस्त्यावरील खड्यात साचत असल्याने परिसरात चिखल, घाण आणि दुर्गंधी पसरली आहे. हा रस्ता अत्यन्त राहादारीचा असल्यामुळे नागरिकांना या साचलेल्या दूषित पाण्यातून मार्ग काढावा लागत आहे.

वाईन ते चेंबरी रेस्ट हाऊस पर्यंत जुनी नाली असून ती जर तात्काळ चालू करून या नालीत पाणी सोडून दिल्यास पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने होईल.

चौक ते उड्डाणं पूल तसेच चौक ते गंगाखेड पर्यंत सिमेंट रोड झालेला आहे परंतु (पान २ वर)

महात्मा फुलेंच्या नावावर मार्केट... अन् टेरेसवर मद्याचा बाजार! परवानगी नाही, तरी बार चालतो कुणाच्या आशीर्वादावर?

नांदेड वाघाळा शहर महापालिकेच्या लेखी उत्तराने खळबळ; 'स्काय बार' प्रकरणात अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह, नगरसेविका अश्विनी धोंगडे यांची कठोर कारवाईची मागणी!

नांदेड/मकसूद पटेल

ज्या क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुलेंनी समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, विषमता आणि अन्यायाविरुद्ध आयुष्यभर संघर्ष केला, त्यांच्याच नावाने उभारलेल्या नांदेड शहरातील महात्मा फुले मार्केटच्या टेरेसवर बिअर बार सुरू असल्याची गंभीर तक्रार समोर आली आहे. विशेष म्हणजे, संबंधित बार चालविण्यास कोणत्याही प्रकारची परवानगी दिलेली नसल्याचे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालय क्रमांक ३, शिवाजीनगर यांनी लेखी स्पष्ट केले आहे. त्यामुळे



महापालिकेच्या संबंधित कार्यालयाची परवानगी नसतानाही हा व्यवसाय नेमका कोणत्या प्राधिकरणाच्या मंजुरीवर सुरू आहे, असा सवाल उपस्थित झाला आहे. महात्मा फुलेंच्या नावाचा सन्मान करणाऱ्या महापालिकेच्या नाकाखालीच हा प्रकार सुरू (पान २ वर)



नाथ शिक्षण संस्था संचलित यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालय येथे बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.अतुल दुबे, प्रा.यू.एन.फड, प्रा.ए.डी.शेख, एस.बी.अष्टेकर, यू. बी.जगताप यांच्या सह प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी दिसत आहेत.

मोहिखेड येथे प्रहार संघटनेची शाखा स्थापन

२२ दिव्यांग बांधवांची नोंदणी; संघटनात्मक कार्याला उत्स्फूर्त प्रतिसाद



धारूर/अतूल शिनगारे

धारूर तालुक्यात प्रहार संघटनेच्या संघटनात्मक विस्ताराला वेग आला असून, तालुक्यातील मोहिखेड येथे प्रहार संघटनेची नवीन शाखा उत्साहपूर्ण वातावरणात स्थापन करण्यात आली. या उपक्रमाला दिव्यांग बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी तब्बल २२ दिव्यांग बांधवांची संघटनेत नोंदणी करण्यात आली.

प्रहार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा दिव्यांग, शेतकरी, शोषित आणि वंचितांचे आधारस्तंभ बच्चूभाऊ कडू यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर सदस्य नोंदणी व शाखा स्थापना अभियान राबविण्यात येत आहे. याच अभियानांतर्गत मोहिखेड येथे जिल्हाध्यक्ष रघुनाथ तोंडे, धारूर तालुकाध्यक्ष विठ्ठल मुंडे व राहुल घनगाव यांच्या प्रमुख उपस्थितीत शाखेची स्थापना करण्यात आली.

संस्कार प्राथमिक शाळा, विद्यानगर विभागात जननायक बिरसा मुंडा यांची जयंती साजरी

जननायक बिरसा मुंडा यांच्या विचारांतून विद्यार्थ्यांनी राष्ट्रप्रेम व स्वाभिमानाची प्रेरणा घ्यावी-दीपक तांदळे

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात समाजाच्या अस्मितेसाठी, हक्कांसाठी आणि स्वाभिमानासाठी संघर्ष करणारे महान जननायक, क्रांतिकारक आणि आदिवासी समाजाचे प्रेरणास्थान जननायक बिरसा मुंडा यांची जयंती श्री पद्मावती शिक्षण संस्था संचलित संस्कार प्राथमिक शाळा, विद्यानगर विभागात मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली.विद्यार्थ्यांमध्ये थोर महापुरुषांच्या विचारांची ओळख निर्माण व्हावी, त्यांचे कार्य समजावे आणि त्यांच्यात राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी व सेवाभावाची मूल्ये रुजावीत, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री पद्मावती



शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. कैलास तांदळे यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव श्री. दीपक तांदळे तसेच संस्कार प्राथमिक शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक श्री. अमरशील गायकवाड सर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते जननायक बिरसा मुंडा आणि शिक्षणमहर्षी कै. विठ्ठलरावजी तांदळे सर यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संस्थेचे सचिव श्री. दीपक तांदळे म्हणाले की, ''जननायक बिरसा मुंडा हे केवळ एका समाजाचे नेते नव्हते, तर ते अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या प्रत्येकासाठी प्रेरणास्थान आहेत. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी आपल्या समाजाच्या हक्कांसाठी संघर्ष केला. आदिवासी समाजामध्ये जागृती निर्माण करून त्यांना एकजुटीने अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या जीवनातील धैर्य, त्याग, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठा ही मूल्ये विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात अंगीकारली पाहिजेत. (पान २ वर)

तब्बल ३९ वर्षांनी झाली वर्ग मित्र मैत्रिणींची भेट



अणदूर/सचिन तोगी

अणदूर येथील जवाहर विद्यालयाच्या इयत्ता १० वी १९८७ बॅचच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा दि.१४ नोव्हेंबर २०२६ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंती दिनी पार पडला. श्री श्री गुरुकुल अणदुरच्या प्रांगणात झालेल्या या स्नेह मेळाव्यात सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत अगदी उत्साह पूर्ण वातावरणात हा कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी सर्वप्रथम श्री श्री रविशंकर गुरुजी ,पंडित जवाहरलाल नेहरू आणि सि ना आलुरे गुरुजी यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्यानंतर महादेव नरे गुरुजी ,भगीरथ कुलकर्णी ,नवनाथ संगशेट्टी ,श्रीमंत मुळे ,बाबुराव कराळे ,दत्तात्रय करंडे, मारुती सारणे ,धोंडीबा एकुंडे, सुभाष लंगडे ,रामलिंग पडवळ आणि शशिकला पाटील मॅडम या गुरुजनांचा (पान २ वर)

कष्टाचे चीज झाले! कौडगाव हुडा येथील पाच विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत पटकावली डॉक्टरकीची पदवी

शेतकरी, मोटार मेकॅनिक आणि रिक्षाचालकांच्या मुलांनी उज्ज्वल यश मिळवत गावाचे नाव केले उंचावले; आई-वडिलांच्या संघर्षाला यशाचे फळ

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, तरी जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर यशाचे शिखर गाठता येते, हे कौडगाव हुडा येथील पाच विद्यार्थ्यांनी सिद्ध करून दाखवले आहे. अत्यंत हलाखीच्या आर्थिक परिस्थितीवर मात करत गावातील पाच विद्यार्थ्यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून डॉक्टर होण्याचा मान मिळवला आहे. त्यांच्या या यशामुळे गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या यशामागे केवळ विद्यार्थ्यांची मेहनत नसून त्यांच्या आई-वडिलांचा त्याग, कष्ट आणि मुलांच्या शिक्षणासाठी घेतलेले अपार परिश्रम दडलेले आहेत. कोणाचे वडील शेतकरी, तर कोणाचे मोटार मेकॅनिक, तर कोणी ऑटो रिक्षा चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारे. आर्थिक परिस्थिती बेताची असतानाही त्यांनी मुलांच्या शिक्षणात कोणतीही कमतरता भासू दिली नाही.

सकाळी लवकर उठून शेतात जाणे, दिवसभर उन्हातान्हात कष्ट करणे, मोटार दुरुस्तीच्या कामातून मिळणाऱ्या उत्पन्नावर संसार चालवणे, तर कधी रिक्षा चालवून कुटुंबाचा गाडा ओढणे, असा या पालकांचा संघर्षमय प्रवास होता. पुस्तकांसाठी पैसे लागले तर स्वतःच्या गरजा बाजूला ठेवल्या, महाविद्यालयाची फी भरण्याची वेळ आली तर प्रसंगी इकडून-तिकडून पैसे जमवले; मात्र मुलांचे शिक्षण थांबू दिले नाही.

आईने काटकसर करून मुलांच्या गरजा पूर्ण केल्या, तर वडिलांनी स्वतःच्या गरजांवर पाणी सोडून मुलांच्या शैक्षणिक भवितव्यासाठी प्रत्येक शक्य प्रयत्न केला. कधी स्वतः फाटक्या चपला वापरल्या, पण मुलांना शैक्षणिक साहित्याची कमतरता भासू दिली नाही. त्यांच्या याच त्यागाचे आणि संघर्षाचे आज सोने झाले आहे.

आज हीच मुले डॉक्टर बनून आपल्या आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करत आहेत. त्यांच्या मेहनतीचे चीज झाले असून त्यांनी केवळ आपल्या कुटुंबाचेच नव्हे, तर संपूर्ण कौडगाव हुडा गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मिळवलेले हे यश ग्रामीण भागातील इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरणार आहे. डॉक्टर झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे :

१) डॉ. अजय रामेश्वर भोसले (एमबीबीएस)
२) डॉ. महादेव रतन गव्हाणे (एमबीबीएस)
३) डॉ. वैष्णवी रतन गव्हाणे (एमबीबीएस)
४) डॉ. ओमकार दत्तात्रय भोरकडे (बी.ए.एम.एस.)
५) डॉ. साक्षी दत्तात्रय भोरकडे (बी.ए.एम.एस.)

या पाचही विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश हे त्यांच्या आई-वडिलांच्या त्यागाचे, कष्टाचे आणि संस्कारांचे फलित आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल कौडगाव हुडा ग्रामस्थांकडून अभिनंदन होत असून, त्यांच्या पुढील वैद्यकीय सेवेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या जात आहेत. खऱ्या अर्थाने, गरीब घरातील संघर्षातून डॉक्टर घडविणाऱ्या या माता-पित्यांच्या कष्टाला आणि जिद्दीला मानाचा मुजरा!



जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशन, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, 'जगमित्र' बाजीप्रभू नगर नेहरू चौक (तळ) परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड तर दैनिक जगमित्र कार्यालय घर क्र.२०, खडगाव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बौध्द विहार जवळ लातूर घर क्र.२२/२० एसटी कॉलनी, बाशी नाका, धाराशिव तनिश ऑर्किड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी आरडी., चारोली फाटा, ता. हवेली, पुणे ९-२-३४६, बिलाल नगर, देलगूर नाका, इतवारा नांदेड प्लॉट क्र.६६/२ सीटीएस क्र.९०, मयुरी रेसी, महिंद्रा शोरूमच्या मागे, छ.संभाजीनगर रोड, जालना येथे प्रकाशित केले आहे. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) कार्यकारी संपादक : बिलाल शेख मो.नं.९४२२४०४७४०

'Jagamitra' is printed by Balasaheb Jijaram Kadbane (Printer, Publisher, Owner, and Editor) at Jagamitra Offset, near Nehru Chowk, Bajiprabhu Nagar, Parli Vaijnath (Dist. Beed, Maharashtra). It is published from the following locations: 'Jagamitra' Office, Bajiprabhu Nagar, Nehru Chowk (Ground Floor), Parli Vaijnath 431515, Dist. Beed; House No. 20, Khadgaon Road, Krantinagar, near Vishwashanti Buddha Vihar, Latur; House No. 22/20, ST Colony, Bashi Naka, Dharashiv; Tanish Orchid, Phase-2, R-Wing, 1105, Alandi Road, Charoli Phata, Tal. Haveli, Pune; 9-2-346, Bilal Nagar, Delgur Naka, Itwara, Nanded; and Plot No. 66/2, CTS No. 90, Mayuri Residency, behind Mahindra Showroom, Chh. Sambhajinagar Road, Jalna. (The Editor does not necessarily agree with the content or news published in the daily; the responsibility for content selection rests with the designated person as per the PRB Act.) Executive Editor: Bilal Shaikh (Mobile No. 9422404740).